कुटुंब, मित्र आणि निसर्गासोबत एक अविस्मरणीय दिवस!
ह्या सुट्टीचा महाआनंद आणि धमालच धमाल....
आमरस पार्टी वनभोजन
रेन डान्स / बोटींग / पपेट शो
बर्डपार्क / झीप लाईन
ॲडव्हेंचर्स / वॉटर स्पोर्टस्
डॉ. कांकरियांचे साईबन
9112288622
9850500905 / 9096639368
डॉ. कांकरियांचे साईबन कृषी पर्यटन केंद्र, एम.आय.डी.सी.मागे, अहिल्यानगर




संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २२.०५.२०२६ | अंक नं. ०४४ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



अधिक मासानिमित्त
खास धोंड्याचा बेत
650/- प्रति व्यक्ती
सोलकढी, पुरणपोळी, आमटी, बटाट्याची सुकी भाजी, पंजाबी भाजी, पालक मजी, आलू वडी, भात, पुरी, कोशिंबीर, आमरस, लोणचे, कुरडई, पापड
VINTAGE HILLS
बुकिंगसाठी संपर्क : 6262-90-6262

अधिक मास
आता बनवा अधिक खास
खास धोंड्यानिमित्त जावाई व मुलीला वाण देण्यासाठी आकर्षक व वेगवेगळ्या वजनामधील चांदीची भांडी उपलब्ध.
2014 पासुन आपल्या सेवेत..
सोनेरी नातं..
चंदुकाका ज्वेल्स
शॉप नंबर 2/3, साई मिंडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

एकदम दहा वीस रुपये वाढवण्यापेक्षा दररोज एक रुपया वाढवायचा
म्हणजे मग लोकांमध्ये उद्रेक होत नाही हळूहळू महागाईची सवय होते
नाईलाज आहे कोणाचा दोष नाही..
नागरिकांनीच विवेक बुद्धी ने बचत करावी
suhas Mulay. com


# नगर शहर परिसरात दुचाक्यांबरोबरच चारचाकी वाहनांच्याही चोऱ्या वाढल्या

## एकाच दिवसात २ स्कॉर्पिओ गाड्या गेल्या चोरीला, चोरांना शोधण्याचे पोलिसांसमोर आव्हान

नगर – नगर शहर परिसरातून दुचाक्या चोरीला जाण्याचे सत्र सुरूच असून गेल्या काही दिवसांत विविध ठिकाणाहून अनेक मोटारसायकल चोरीला गेल्या आहेत. त्याच बरोबर आता चारचाकी वाहनेही चोरीला जावू लागले आहेत. सावेडी उपनगर परिसरातून एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून म हिंद्रा कंपनीच्या २ स्कॉर्पिओ गाड्या चोरीला गेल्या आहेत. या वाहन चोरांना पकडून या चोऱ्या रोखण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

शहरातील विविध भागातून दुचाकी बरोबरच चारचाकी वाहने चोरीला जात आहेत. विशेष करून शासकीय कार्यालये, दवाखाने, हॉटेल्स यांच्या पार्किंग मधून दुचाक्या चोरीला जाण्याचे प्रमाण अधिक आहे. जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या आवारातून, जिल्हा परिषद कार्यालयाच्या आवारातून गेल्या काही दिवसांत अनेक दुचाक्या चोरीला गेल्या आहेत. त्यातील एकाही गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. उपनगरात नागरिकांच्या रहिवासी इमारतीच्या पार्किंग मधून रात्रीच्या वेळी वाहने चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे.

शहरात कधी कधी एकाच दिवसात ४ ते ५ दुचाक्या चोरीला जाण्याच्या घटना घडल्या आहेत. परिसरात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये हे चोर कैद होतात. पण पोलिसांना ते हाती लागत नसल्याने वाहने चोरीला गेलेले नागरिक हतबल झाले आहेत. सध्या दुचाकी वाहनांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. कोणतीही दुचाकी खरेदी करायला गेले की किमान लाखभर रुपये मोजावे लागतात. अनेक जण फायनान्स कंपन्यांचे कर्ज घेवून वाहने खरेदी करतात पण ते कर्ज फिटायच्या पूर्वीच दुचाकी चोरीला गेल्याने वाहन तर गेले वरून डोक्यावर कर्ज तसेच राहिले अशी अवस्था नागरिकांची होत आहे. तशीच अवस्था चारचाकी वाहन धारकांचीही आहे.

### पाईपलाईन रोड व बालिकाश्रम रोडवरून महिंद्रा स्कॉर्पिओच्या चोऱ्या

पाईपलाईन रोडवरील एकविरा चौक परिसरातील वसंत रेसिडेन्सी च्या पार्किंग मध्ये उभी केलेली पांढऱ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी (क्र. एमएच २० जी व्ही ८७६३) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना २० मे रोजी दुपारी ३.३० ते २१ मे रोजी पहाटे ५.३० या कालावधीत घडली आहे. याबाबत भगवान ज्ञानदेव जुंदरे (वय ४०, रा. वसंत रेसिडेन्सी, एकविरा चौक, पाईपलाईन रोड यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

चोरीची दुसरी घटना बालिकाश्रम रोडवरील महालक्ष्मी उद्यानाजवळ २० मे रोजी रात्री ९.३० ते २१ मे रोजी सकाळी ९ या कालावधीत घडली आहे. महालक्ष्मी उद्यानाजवळ असलेल्या राजलक्ष्मी बंगला येथे पार्किंग मध्ये उभी केलेली काळ्या रंगाची स्कॉर्पिओ एन गाडी (क्र. यु पी ३२ क्यु जे ३७२७) अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. याबाबत हिमांशू अमरेंद्र सिंग (रा. राजलक्ष्मी बंगला, महालक्ष्मी उद्यानाशेजारी, बालिकाश्रम रोड) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून पोलिसांनी या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

### कल्याण रोडवरून मोटारसायकलची चोरी

कल्याण रोड परिसरात आदर्श नगर, विद्या कॉलनी येथे घरासमोर लावलेली होंडा कंपनीची युनिकॉर्न मोटारसायकल (क्र. एम एच १६ सी डब्ल्यू ६९०६) अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २० मे रोजी रात्री १० ते २१ मे रोजी सकाळी १० या कालावधीत घडली आहे.

याबाबत बळीराम वामन बारगजे (वय ३९, रा. आदर्श नगर, विद्या कॉलनी) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०५ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# उन्हामुळे चक्कर आल्याने मिस्किन मळा रस्त्यावरील कारला दुचाकीस्वार धडकला; प्रकृती गंभीर

नगर – सध्या उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून, २२ मे रोजी भर उन्हात दुचाकी चालवत जाणाऱ्या एका व्यक्तीला उन्हामुळे अचानक चक्कर आल्याने दुचाकीवरील नियंत्रण सुटून तो रस्त्याच्या कडेला अभ्या असलेल्या कारला जावून धडकला. या अपघातात दुचाकीस्वाराच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, त्याची प्रकृती गंभीर असल्याचे हॉस्पिटल प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

संबंधित व्यक्ती हा मोपेड दुचाकीवरुन (क्र. एम एच १६, डीएच ८३५८) मिस्किन मळा रोडवरुन ताकपूरच्या दिशेने जात होता. त्याचवेळी केडगाव येथील एका डॉक्टरची कार रस्त्याच्या कडेला उभी होती. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, संबंधित व्यक्तीला उन्हामुळे चक्कर आली असावी. त्यामुळे त्याचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि तो रस्त्याच्या कडेला असलेल्या कारवर जावून आदळला. धडकेनंतर संबंधित व्यक्तीचे डोके डांबरी रस्त्यावर जोरात आदळले. त्यामुळे डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव होऊन तो जागेवरच बेशुद्ध पडला. या अपघातात कार आणि दुचाकीचेही किरकोळ नुकसान झाले.



अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली. डोक्यातून मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव सुरु असल्याने नागरिकांनी तातडीने रक्तबंबाळ अवस्थेत अपघातग्रस्त व्यक्तीला साईदीप हॉस्पिटलमध्ये दाखल केले.

हॉस्पिटल प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, जखमी व्यक्तीची प्रकृती गंभीर असून त्याला तातडीने अतिदक्षता विभागात (आयसीयु) दाखल करून उपचार सुरू करण्यात आले आहेत. अपघात झाला तेव्हा संबंधित व्यक्ती दुचाकीवर एकटाच होता आणि तो अजूनही बेशुद्ध अवस्थेत आहे. त्याच्याकडे कोणतेही ओळखपत्र सापडले नसल्याने अद्याप त्याची ओळख पटू शकलेली नाही.

### स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी

मिस्किन मळा रोडवर अनेक वाहनधारक अत्यंत वेगाने वाहने चालवितात. या रस्त्यावर व्यावसायिक दुकाने, हॉस्पिटल व विविध आस्थापना आहेत. त्यामुळे या रस्त्यावर वेगाने वाहने चालविल्यास अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे या रस्त्यावर ठिकठिकाणी स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी होत आहे.


अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस, पनीर भाजी, सूकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

SONI TILES Since 1985
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar.
Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज


# सरकारने कांद्याला ३० रुपये हमीभाव द्यावा अन्यथा 'शेती तुमच्या नावावर करुन घ्या'

## अहिल्यानगर येथील युवा शेतकऱ्याने गुजरातीतून लिहिले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र

नगर – सध्या देशभरात कांद्याचा प्रश्न चांगलाच गाजत असून, यावरून शेतकऱ्यांमधील संताप अनावर झाला आहे. या पार्श्वभूमीवर, नगर तालुक्यातील युवा शेतकरी इंजिनिअर राहुल बहिरट यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गुजराती भाषेतून पत्र लिहून कांद्याला भाव देण्याची मागणी केली आहे. कांद्याला जर भाव देता येत नसेल आमची शेती, तुमच्या नावावर करून घ्या, अशी मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे.

युवा किसान सामाजिक संस्थेचे अध्यक्ष बहिरट यांनी पंतप्रधानांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारत देशात सर्वाधिक कांदा महाराष्ट्रात पिकवला जातो. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी कांद्याचे प्रश्न आपल्यासमोर मांडले आहेत. सध्या कांद्याला ५० पैसे ते १० रुपये किलोपर्यंत भाव चालू आहेत. म्हणजे सरासरी कांद्याला ५ ते ६ रुपये भाव मिळतो. वास्तविक पाहता हाच कांदा पिकविण्यासाठी १८ ते २० रुपये प्रति किलोला खर्च येत आहे. सध्या मिळणारा भाव हा उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कांद्याला सरकारने ३० रुपये हमीभाव ठरवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

वारंवार मागणी करूनही सरकार कांदा उत्पादकांकडे दुर्लक्ष करत असल्यामुळे बहिरट यांनी पत्राच्या शेवटी आपल्या उद्विग्न भावना व्यक्त केल्या आहेत. कांद्याला योग्य भाव द्या, अन्यथा आमच्या जमिनी तुमच्या नावावर करून देतो, अशी उपरोधिक मागणीही बहिरट यांनी केली आहे.


Kashmir
Starts @ For 4 nights 5 Days 16800/-
Packages Available 5D, 6D, 7D...
Namoh Since 1981 A Total Travel Solution...
For details contact :- 73505 30009 | 73505 40009 | 73505 50009
www.namohtours.com
Ticket Bookings | Hotel Bookings | International & Domestic Tours | Railway Tours | Customized Tours | Corporate Tours | Group Tours | MICE | Insurance | Passport/ Visa

Happy Birthday
मित्रांसाठीचे प्रेम आणि आपुलकीनी गच्च भरलेलं आपलं मनं..
आमचे मित्र
राहूल गांधी
हॅलो - 8484022222
8329771177
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक
हॅलो ग्रुप
नातेवाईक ग्रुप
अहिल्यानगर, पुणे, नाशिक

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# रात्रीच्या वेळी संशयितरित्या फिरणाऱ्या दोन जणांना पकडले

नगर – कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्ती दरम्यान पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणी संशयितरीत्या फिरणाऱ्या दोन व्यक्तींना ताब्यात घेतले आहे. सोहेल राजू शेख (वय २०, रा. महात्मा फुले वसाहत, काटवन खंडोबा) व हर्ष नितीन म्हस्के (वय २०, रा. मंगलगेट) अशी या संशयितांची नावे आहेत.

पहिली घटना २१ मे रोजी पहाटे १.३० वाजेच्या सुमारास घडली. पोलीस अंमलदार अमोल गाडे व होमगार्ड संदीप नेटके हे गस्त करत असताना वरद टॉवर्स बिल्डिंग परिसरात बंगाल चौकी ते मुंजोबा स्वीट रस्त्यावर एक व्यक्ती संशयितरीत्या फिरताना दिसून आला. पोलिसांचे वाहन पाहताच तो अंधाराचा फायदा घेत पळू लागला. पाठलाग करून त्यास ताब्यात घेण्यात आले. त्याने आपले नाव सोहेल राजू शेख (वय २०, रा. महात्मा फुले वसाहत, काटवन खंडोबा) असे सांगितले. रात्रीच्ले वेळी फिरण्याबाबत समाधानकारक उत्तर न दिल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना त्याच रात्री १२.३० वाजेच्या सुमारास घडली. अंमलदार अतुल काजळे व होमगार्ड नीलेश गाजरे हे गस्त करत असताना फेरा ब्रुस हायस्कूल मैदान परिसरात एक व्यक्ती फिरताना दिसून आला. पोलिसांना पाहताच तो पळण्याचा प्रयत्न करत होता. त्यास पाठलाग करून ताब्यात घेण्यात आले. त्याने आपले नाव हर्ष नितीन म्हस्के (वय २०, रा. मंगलगेट) असे सांगितले.

चौकशीदरम्यान त्याने समाधानकारक माहिती न दिल्याने त्यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सिद्धी फाऊंडेशन आयोजित शिबिरात २०२६ दात्यांचे विक्रमी रक्तदान

नगर – सिद्धी फाउंडेशनचा १८ वा रक्तदान उपक्रम २१ मे रोजी महावीर प्रतिष्ठान, डी जॅक, पुणे येथे उत्साहात पार पडला. सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात तब्बल २०२६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत सामाजिक बांधिलकीचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध सामाजिक संस्था, युवक, महिला, व्यावसायिक तसेच नागरिकांनी उपस्थित राहत रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याच्या कार्यात सहभाग घेतला.

या शिबिराचे आयोजन सिद्धी ग्रुपचे मनोज छाजेड, ललित शिंगवी, मुकेश छाजेड, जिनूभाई लोढा यांच्यासह समाजातील अनेक कार्यकर्त्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने केले. संपूर्ण शिबिरात स्वयंसेवकांची धावपळ, रक्तदात्यांचा उत्साह आणि सामाजिक एकात्मतेचे वातावरण अनुभवायला मिळाले.



सिद्धी ग्रुपने आयोजिलेल्या रक्तदान शिबिरात खा. रोहित पवार उपस्थित राहिले याबद्दल त्यांचा सत्कार करताना मनोज छाजेड, ललित शिंगवी आदी.

उन्हाळ्याची तीव्रता लक्षात घेऊन यंदाच्या शिबिरात रक्तदात्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेसाठी विशेष नियोजन करण्यात आले होते. शिबिरस्थळी पुरेशी सावली, नाश्ता व जेवणाची व्यवस्था, प्राथमिक वैद्यकीय तपासणी तसेच विश्रांतीसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. रक्तदान प्रक्रियेदरम्यान कोणालाही त्रास होऊ नये यासाठी स्वयंसेवक आणि वैद्यकीय पथक सतत कार्यरत होते. या उपक्रमामुळे पुणे शहरासह परिसरातील विविध रुग्णालयांना वेळेवर रक्तपुरवठा उपलब्ध होणार असून अनेक गरजू रुग्णांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे. रक्तदानाबरोबरच समाजात आरोग्य, सहकार्य आणि मानवतेचा संदेश पोहोचविणारा हा उपक्रम नागरिकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

विशेष म्हणजे संध्याकाळी उशिरापर्यंत रक्तदात्यांच्या मोठ्या रांगा कायम होत्या. वेळेच्या मर्यादेमुळे अखेर शिबिर बंद करण्याची घोषणा करावी लागली. अनेक नागरिक रक्तदानासाठी उत्सुक असूनही वेळ संपल्याने त्यांना परत जावे लागले.

या शिबिराला विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भेट देत उपक्रमाचे कौतुक केले. प्रमुख उपस्थितांमध्ये रोहित पवार, हेमंत रासने, श्रीनाथ भिमाले यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच डीसीपी मिलिंद मोहिते, डीसीपी अमोल झेंडे, डीसीपी ए. राजा यांच्यासह पोलीस अधिकारी व विविध शासकीय अधिकाऱ्यांनी शिबिराला भेट देत रक्तदात्यांचे आणि आयोजकांचे कौतुक केले. विजयकांत कोठारी, ॲड. एस के जैन, विजय भंडारी, राजेश साकला, विलास राठोड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते तसेच सर्व समाजातील अनेक गणमान्य व्यक्ती उपस्थित होते.

## महिलांची विशेष उपस्थिती ठरली आकर्षण

या रक्तदान महायज्ञामध्ये महिलांचा सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. तब्बल साडेसातशे ते आठशे महिलांनी रक्तदान करत समाजासमोर प्रेरणादायी उदाहरण ठेवले. महिलांच्या या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण उपक्रमाला एक वेगळी ऊर्जा आणि सकारात्मक वातावरण लाभले.

रक्तदान हे केवळ एक सामाजिक कार्य नसून एखाद्याला नवजीवन देण्याचे माध्यम आहे. गेल्या १८ वर्षांपासून समाजाकडून मिळालेल्या विश्वासामुळेच हा उपक्रम प्रत्येक वर्षी अधिक व्यापक होत आहे. यंदाचा विक्रमी प्रतिसाद आमच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे, असे मनोज छाजेड म्हणाले.

उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर रक्तदात्यांच्या सुरक्षिततेसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. समाजातील प्रत्येकाने पुढे येऊन या जीवनदायी कार्यात सहभागी व्हावे, हा आमचा उद्देश आहे, असे ललित जैन यांनी सांगितले.

# अहिल्यानगर जनगणना मोहिमेत दोन प्रगणकांनी रचला नवा आदर्श

## प्रशासनाकडून सत्कार, कडक उन्हातही विक्रमी कामगिरी

नगर – भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेला अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेग आला असून आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना–२०२७ चे काम युद्धपातळीवर सुरू आहे. प्रत्येक प्रगणकाला ३० दिवसांचा कालावधी आणि निश्चित प्रभागनिहाय घरांची जबाबदारी देण्यात आलेली असताना, काही कर्मचाऱ्यांनी आपल्या कामातून वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.



अरुण मारुती पवार व सौ. श्रद्धा सुभाष कुलकर्णी यांनी आपल्या वाट्याला आलेले जनगणनेचे काम तब्बल १०० टक्के पूर्ण केल्याबद्दल अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर तसेच सहायक आयुक्त मेहेर लहारे यांनी त्यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले.

प्रभाग समिती क्रमांक ०२, शहर विभागातील जनगणना २०२७ चे पर्यवेक्षक अनिल सुद्रिक यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेले प्रगणक अरुण मारुती पवार व सौ. श्रद्धा सुभाष कुलकर्णी यांनी आपल्या वाट्याला आलेले जनगणनेचे काम तब्बल १०० टक्के पूर्ण करून एक वेगळाच विक्रम प्रस्थापित केला आहे.

विशेष म्हणजे, कडक उन्हाळा, वेळेचे बंधन आणि तांत्रिक प्रक्रियेची आव्हाने असतानाही त्यांनी अत्यंत कमी कालावधीत नकाशा तयार करणे, घरांना क्रमांक देणे आणि HLO ॲपच्या साहाय्याने घरगणना प्रक्रिया वेगाने आणि अचूकपणे पूर्ण केली. त्यांच्या या कामगिरीने जनगणना मोहिमेत नवा मापदंड निर्माण केला असल्याची चर्चा महानगरपालिका वर्तुळात सुरू आहे.

या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कामगिरीची दखल घेत अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर तसेच सहायक आयुक्त मेहेर लहारे यांनी त्यांचा विशेष सत्कार करून अभिनंदन केले. यावेळी त्यांच्या कार्याचे कौतुक करत इतर प्रगणकांसाठीही हा आदर्श असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

प्रभारी अधिकारी अजीम शेख यांचे मार्गदर्शन या गटाला लाभले. कडक उन्हात रस्त्यावर फिरत, प्रत्येक घरापर्यंत पोहोचत आणि वेळेची शर्यत जिंकत पूर्ण झालेली ही मोहीम आता इतर प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यासाठी प्रेरणेचा विषय ठरत आहे. नियोजन, मेहनत आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर असेल तर कोणतेही लक्ष्य अशक्य नसते, हे या कामगिरीतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

अहिल्यानगरच्या जनगणना मोहिमेत आता या कामगिरीची जोरदार चर्चा सुरू असून, अनेकांच्या मते हे केवळ काम पूर्ण होणे नसून कर्तव्यनिष्ठा, समर्पण आणि सांघिक कार्याचा आदर्श नमुना आहे.

# ३ दिवसांत १०० टक्के जनगणना कार्य पूर्ण करणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षक यांचा आयुक्तांच्या हस्ते सन्मान

नगर – भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने देशभर सुरू असलेल्या जगातील सर्वात मोठ्या डिजिटल जनगणना मोहिमेला अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात वेग आला असून आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना २०२७ चे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. प्रत्येक प्रगणकाला ३० दिवसांचा कालावधी आणि निश्चित प्रभागनिहाय घरांची जबाबदारी देण्यात आलेली असताना काही कर्मचाऱ्यांनी अवघ्या तीनच दिवसांत जनगणनेचे १०० टक्के काम अचूक पूर्ण करत नवीन आदर्श निर्माण केला आहे.


अवघ्या ३ दिवसांत १०० टक्के जनगणना कार्य पूर्ण करणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षक यांचा सन्मान करताना आयुक्त यशवंत डांगे. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिका क्षेत्रात ४२ अंश तापमानातही अवघ्या तीन दिवसांत १०० टक्के जनगणनचे कामकाज पूर्ण करणाऱ्या बुरुडगाव झोनमधील प्रगणक व पर्यवेक्षक यांचा अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त तथा मुख्य जनगणना अधिकारी यशवंत डांगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी अतिरिक्त नागेंद्र मुतकेकर, सहायक आयुक्त मेहेर लहारे, उपायुक्त एस.बी.तडवी, अमोल कोतकर,ऋषीकेश सातपुते उपस्थित होते.

प्रभाग समिती क्रमांक चार बुरुडगाव चार्ज अधिकारी एस.बी.तडवी व पर्यवेक्षक अभिजीत जोशी व योगेश गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली घरयादी गट क्रमांक १८६ चे प्रगणक भाऊसाहेब कबाडी, सर्कल २७ मधील प्रगणक संजय शिंदे व भारती गुंड यांनी अवघ्या तीन दिवसांत जनगणनचे शंभर टक्के काम पूर्ण करत नवा आदर्श निर्माण केला.

# इंधन बचत, पर्यावरण संरक्षण, आरोग्याचा संदेश देत अधिकारी, कर्मचारी पायी चालत पोहोचले कार्यालयात

## नो व्हेईकल डेला उत्स्फूर्त प्रतिसाद; हरित संकल्प मोहिमेला सुरुवात; गुलाबपुष्प देऊन स्वागत!

नगर – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत व पर्यावरण संरक्षणाच्या आवाहनाला, तसेच राज्य शासनाच्या हरित उपक्रमांना प्रतिसाद देत अहिल्यानगर जिल्ह्यात शुक्रवारी नो व्हेईकल डे उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत अनेक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःहून पुढाकार घेत सायकल, इलेक्ट्रिक वाहने, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करीत किंवा पायी कार्यालयात येणे पसंत केले.


जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी साडेनऊ वाजता पायी चालत आलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत करण्यात आले.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना (महाराष्ट्र राज्य शाखा, अहिल्यानगर) तसेच महसूल संघटनेच्या वतीने मागील आठवड्यात नो व्हेईकल डेची घोषणा केली. या घोषणेनंतर २२ मे रोजी पहिलाच शुक्रवार होता. उपक्रमाच्या पहिल्याच दिवसी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते आणि जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक सुरेश आघाव हे स्वतः सायकल चालवत कार्यालयात पोहोचले. उपजिल्हाधिकारी सुभाष दळवी, उपजिल्हाधिकारी गौरी सावंत, तहसीलदार शोभा पुजारी आणि तहसीलदार संचेती यांनी सार्वजनिक वाहतुकीचा वापर केला व त्यानंतर कार्यालयापर्यंत पायी चालत येत या उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या या कृतीमुळे कर्मचाऱ्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला. जे कर्मचारी सायकल, इलेक्ट्रिक बाईक आणि पायी कार्यालयात आले, त्यांचे प्रशासनाच्या वतीने गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, सरचिटणीस रावसाहेब निमसे, उपाध्यक्ष अशोक मासाळ, महिला जिल्हाध्यक्षा वंदना नेटके आदींनी पुढाकार घेतला.

राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तसेच महसूल संघटनेच्या संयुक्त पुढाकारातून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाला जिल्हाधिकारी, अप्पर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सक्रिय पाठिंबा दिला.

केवळ वाहने बंद न ठेवता पर्यावरणासाठी आणखी एक पाऊल पुढे टाकण्यात आले आहे. याप्रसंगी एक कर्मचारी – एक वृक्ष दत्तक ही पर्यावरणपूरक संकल्पना मांडण्यात आली. आगामी पावसाळ्यात केवळ वृक्षारोपण करून न थांबता, प्रत्येक कर्मचाऱ्याने स्वतः लावलेले झाड जगविण्याची पूर्ण जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. याशिवाय शासकीय कार्यालय परिसर पूर्णपणे प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्याचाही महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांचा दैनंदिन कामाचा ताणतणाव कमी करण्यासाठी आगामी काळात महिन्याला सायकल रॅली, ट्रेकिंग, योग, ध्यानधारणा व सुदर्शन क्रिया सत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

# नगरमध्ये सुगंधी तंबाखूचा साठा पकडला

नगर – पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा व तोफखाना पोलिसांनी शहरातील महेश टॉकीज परिसरात २१ मे रोजी सकाळी संयुक्त कारवाई करत प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला. या कारवाईत ५२ हजार ५०० रूपये किंमतीची तंबाखू व पाच लाख रूपये किंमतीचा टेम्पो असा एकूण पाच लाख ५२ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून एक संशयित आरोपी पसार आहे.

पोलीस अंमलदार सुमित गवळी यांच्या फिर्यादीवरून धामणगाव (ता. आष्टी, जि. बीड) येथील चंदु पानच्या मालकाविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ, सहायक पोलीस निरीक्षक शिशिरकुमार देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. तोफखाना पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# दगडू कवडे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – हभप दगडू (महाराज) मारुती कवडे (वय ८०) यांचे २१ मे रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शिरापूर, ता.आष्टी, स्मशानभूमी (जि.बीड) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या २ मुले, सुना, नातवंडे, १ मुलगी, जावई असा परिवार आहे.

# शिर्डीत २३ व २४ मे रोजी ‘संरक्षण उत्पादन प्रदर्शन’

शिर्डी – शिर्डी येथील सावळीविहीर औद्योगिक वसाहतीत उभारण्यात आलेल्या तोफगोळा उत्पादन प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळ्याच्या निमित्ताने २३ आणि २४ मे रोजी विद्यार्थी आणि नागरिकांसाठी संरक्षण साहित्याच्या उत्पादनाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये रॉकेट आणि क्षेपणास्त्रे विशेष आकर्षण असणार आहेत. देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या हस्ते सावळीविहीर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये ’निबे ग्रुप’च्या संरक्षण उत्पादन प्रकल्पाचे उद्घाटन होणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच कार्यान्वित होत असलेल्या प्रकल्पामुळे अहिल्यानगर जिल्हा देशातील महत्त्वाचे संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून भविष्यात ओळखला जाईल. या प्रकल्पामध्ये १५५ मिलीमीटर क्षमतेच्या तोफगोळ्यांचे उत्पादन करण्यात येणार असून, प्रतिवर्षी पाच लाख तोफगोळे तयार करण्याची या कारखान्याची क्षमता आहे. संपूर्ण उत्पादन तंत्रज्ञान व कच्चा माल स्वदेशी आहे. हा प्रकल्प अवघ्या एका वर्षात उभारण्यात आला आहे.

शिर्डी औद्योगिक वसाहतीतील सुमारे दोनशे एकर क्षेत्रावर विविध संरक्षण प्रकल्प विकसित करण्यात येत असून, यामध्ये रॉकेट लाँचर, लांब पल्ल्याच्या रॉकेटचे सुटे भाग, स्वयंचलित ड्रोन व विविध इलेक्ट्रॉनिक यंत्रणांच्या चाचणी सुविधा विकसित केल्या जात आहेत.

उद्घाटनाच्या निमित्ताने २३ व २४ मे रोजी सकाळी साडेदहा ते पाच या वेळेत विशेष संरक्षण प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील प्रमुख संरक्षण उत्पादन कंपन्या व शंभरहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. यासाठी मोठे स्टॉल्स प्रकल्पस्थळावर उभारण्यात आले आहेत. जिल्ह्यातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, विज्ञानप्रेमी, नागरिक आणि महिला या प्रदर्शनाला भेट देतील. तरुणांसाठी संरक्षण क्षेत्रातील संधी जाणून घेण्याची ही एक मोठी संधी निर्माण करून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्याला संरक्षण क्षेत्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभलेली असून, रणगाडा प्रशिक्षण केंद्र, के.के. रेंजेस व मेकॅनाईज्ड इन्फंट्री रेजिमेंटल सेंटरमुळे जिल्ह्याला आधीपासूनच संरक्षण क्षेत्रातील महत्त्व आहे. आता या नवीन संरक्षण उत्पादन प्रकल्पामुळे या ओळखीला अधिक बळ मिळणार आहे.

# एमआयडीसीच्या कंपन्यांमधून विविध साहित्यांची चोरी

नगर – नागापूर एमआयडीसी तील २ कंपन्यांमधून विविध प्रकारचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याच्या घटना घडल्या आहेत. या प्रकरणी एमआयडीसी पोलिस ठाण्यात २ वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पहिली चोरी १८ मे रोजी रात्री ८.३० ते १९ मे रोजी सकाळी ८.३० या कालावधीत जीमखाना रोडवरील साई ॲक्यु कट कंपनीच्या गोडावून मध्ये झाली. या गोडावूनच्या समोरील मोकळ्या मैदानात ठेवलेल्या १३ हजार २०० रुपये किंमतीच्या लोखंडी प्लेट अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या आहेत. याबाबत कंपनीचे सुजित गोपीनाथ काळे (वय ३२, रा. नाना चौक, तपोवन रोड) यांनी फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

दुसरी चोरी नागापूर एमआयडीसीतील विश्वजित एन्टरप्राईजेस मध्ये २० मे रोजी रात्री १० ते २१ मे रोजी सकाळी ८.३० या कालावधीत झाली. अज्ञात चोरट्यांनी या कंपनीचा पत्रा उचकटून आत प्रवेश करत कंपनीमधील ७० हजार ९१८ रुपये किंमतीच्या निकेल प्लेटस चोरून नेल्या आहेत. याबाबत कंपनीचे संदीप रामभाऊ ठोकळ (रा. तपोवन रोड) यांनी फिर्याद दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### हे पदार्थ खावेत कच्चे

आपण अनेकदा सर्व काही तेल आणि मसाल्यांमध्ये तळून किंवा उकडून खातो. आपल्याला वाटते की शिजवल्याने अन्न अधिक स्वच्छ आणि सुरक्षित होते. हे बऱ्याच अंशी खरे आहे, पण ते सर्वच पदार्थांना लागू होत नाही. आहारतज्ञ म्हणतात की आपल्या स्वयंपाकघरातील काही पदार्थ आगीवर ठेवल्यावर त्यातील अर्ध्याहून अधिक पोषक तत्वे नष्ट होतात. जर तुम्ही ते कच्चे खाल्ले, तर त्यांचे फायदे अनेक पटींनी वाढतात. यामध्ये कच्चे खाल्ल्याने बीटा-कॅरोटीन पूर्ण मिळते, डोळ्यांसाठी खूप चांगले. फायबरमुळे पचन सुधारते आणि कर्करोगापासून बचाव होतो. सालीसकट किसून सॅलडमध्ये खा. कच्चा लसूण ॲलिसिनमुळे जंतुनाशक असतो. कोलेस्टेरॉल आणि BP कमी करतो. १-२ पाकळ्या मधासोबत सकाळी खा. वास येतो आणि जळजळ होऊ शकते.

## पाककला

### पान गुलकंद बर्फी

**साहित्य** : खवा / मावा २५० ग्रॅम, मिल्क पावडर १/२ कप, पिठीसाखर १/२ कप चवीनुसार, विड्याची पाने ८ ते १० मध्यम आकाराची, गुलकंद ४ ते ५ चमचे, तूप २ चमचे, वेलची पूड १/२ चमचा, हिरवा खायचा रंग २० थेंब, बडीशेप १ चमचा, सजावटीसाठी पिस्त्याचे काप

**कृती** : विड्याची पाने स्वच्छ धुवून देठ काढून टाका. मिक्सरमध्ये २ चमचे दूध किंवा पाणी घालून बारीक पेस्ट करून घ्या. जाड बुडाच्या कढईत १ चमचा तूप गरम करा. त्यात खवा किसून घाला आणि मंद आचेवर ३० मिनिटे परता. खवा जळू देऊ नका. आता त्यात मिल्क पावडर, पिठीसाखर आणि पानाची पेस्ट घाला. हिरवा रंग हवा असल्यास २० थेंब घाला. सतत ढवळत रहा. मिश्रण घट्ट होऊन कढईच्या कडा सोडू लागले की गॅस बंद करा. मिश्रण थोडे कोमट झाले की त्यात वेलची पूड आणि भरड बडीशेप मिक्स करा. एका ताटाला तूप लावा. तयार मिश्रणाचे दोन सारखे भाग करा. पहिला भाग ताटात पातळ थापा. त्यावर गुलकंद एकसारखा पसरवा. कडेला थोडी जागा सोडा. आता मिश्रणाचा दुसरा भाग गुलकंदावर हलक्या हाताने थापा. सँडविचसारखे लेअर होतील. वरून पिस्त्याचे काप पेरून हलकेच दाबा. १२ तास फ्रीजमध्ये सेट करायला ठेवा. थंड झाल्यावर चौकोनी वड्या कापा.

## वास्तू

### गॅरेजसाठी...

* वायव्य म्हणजे उत्तर-पश्चिम कोपरा. हा वायू तत्वाचा कोपरा आहे. वाहनांच्या हालचालीसाठी सर्वात शुभ.

* ईशान्य म्हणजे उत्तर-पूर्व कोपरा. हा देवघराचा कोपरा आहे. इथे गॅरेज अजिबात नको. यामुळे घरात आजारपण आणि पैशाची अडचण येते. तसेच नैऋत्य म्हणजे दक्षिण-पश्चिम कोपरा टाळा.

## सौंदर्य

* पुरुषांनी रात्री झोपताना पाय स्वच्छ धुवून पुमिस स्टोनने घासावेत. मॉइश्चरायझर लावा. भेगा पडणार नाहीत.

## सल्ला

* कुकरमध्ये पाणी घालून त्यावर चाळणीत भात ठेवून ५ मिनिटे वाफवा. ताज्या भाता सारखा मोकळा होतो.

* गरम पदार्थासाठी प्लॅस्टिक वापरू नका.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शनिवार, दि. २३ मे २०२६

**दुर्गाष्टमी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, अधिक ज्येष्ठ शुक्लपक्ष, मघा २६।०९, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. २७ मि.**

### राशिभविष्य

मेष : मुलांच्या यशाने आनंद मिळेल. नवीन व्यवसायाची सुरुवात लाभदायी ठरेल.

**वृषभ** : नोकरीत प्रगतीचे योग. मित्रांसोबत धार्मिक यात्रेची शक्यता. IT आणि बँकिंग क्षेत्रातील लोकांना यश.

**मिथुन** : खडलेली कामे आज पूर्ण होतील. नोकरीत थोडे अडथळे येतील पण चिंता नको.

**कर्क** : करिअरमध्ये आत्मविश्वास वाढेल. आर्थिक निर्णय सकारात्मक ठरतील. घरातून चांगली बातमी मिळेल.

**सिंह** : सहकाऱ्यांकडून कौतुक होईल. करिअरमध्ये नाव पुढे येईल. मात्र विनाकारण खर्च टाळा, आर्थिक नुकसान होऊ शकते.

**कन्या** : रखडलेले कागदपत्रांचे काम आज मार्गी लागेल. दीर्घकालीन योजनांना योग्य आकार मिळेल.

**तूळ** : सकाळी प्रामाणिकपणाने काम करा. दुपारनंतर थोडा तणाव जाणवेल. आर्थिक बाबतीत गरजेपुरताच खर्च करा.

वृश्चिक : शेअर बाजारात गुंतवणूक करणाऱ्यांना चांगला परतावा मिळेल. नवीन आर्थिक व्यवहार


**धनु** : नवीन घर किंवा वाहन खरेदीसाठी दिवस अनुकूल. मोठ्या गुंतवणुकीचा विचार करू शकता. कुटुंबात आनंदाचे वातावरण.

**मकर** : आज महत्त्वाचे निर्णय घेणे टाळा. मनातील इच्छा पूर्ण होतील. आरोग्याची काळजी घ्या.

**कुंभ** : अडचणीच्या वेळी मित्र मदत करतील. महालक्ष्मीची कृपा राहील. धनलाभ आणि प्रेमप्राप्तीचे योग आहेत.

**मीन** : अनेक नवीन संधी दार ठोठावतील. प्रेमात यश मिळेल, अविवाहितांसाठी सुखद काळ.

## शब्दगंध क्र. ७४३५ सौ.शैलजा कुलकर्णी




**आडवे शब्द :-** १) 'जोपर्यंत वस्तू नवी असते तोपर्यंत तिची मौज' या अर्थाची म्हण ७) ऊस, फळ वगैरेतील द्रव; स्वाद ८) गेलेला; भूत; अवस्था; दशा ९) विष्णुपत्नी; लक्ष्मी १०) लढाऊ जहाजांचा ताफा; नौदल ११) दिन; वासर; दिवस १३) पडणे; पतन; नाश १५) वाळूवर किंवा कागदावर रेघा मारून शकुन पाहण्याची विद्या १७) एक अधिक पाव १९) सशक्त; बलवान; कणखर २०) नखाला होणारा एक रोग २२) वृष्टी; वर्षाव; पाऊस २३) चोप; ताडन २४) एक चित्रपट निर्माती व दिग्दर्शक असलेली महिला

**उभे शब्द :-** १) स्त्री आणि पुरुष; श्रेष्ठ व कनिष्ठ; मोठे व लहान २) महाभारत कथेचे रचनाकार ३) 'शेरीफ'चे मराठी रूप ४) उन्माद; माज; मुजोरी ५) आशीर्वाद; नवरामुलगा ६) शेवट; समापन; अखेर १२) पाहुणचार; आदरातिथ्य १४) उणीव; कमतरता; वानवा १६) घाण; विष्ठा १८) एक मराठी आडनाव; एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू तथा भारतीय संघाचा माजी कर्णधार १९) दोन किंवा अधिक शब्दांचा मिळून बनलेला एक शब्द २०) मुस्लिमांची प्रार्थना २१) पीक खुरपण्याचे हत्यार

**शब्दगंध क्र. ७४३४ चे उत्तर**



**फिल्मीचक्कर क्र. १२३७ चे उत्तर**



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : समुद्राला गर्व होता की तो सगळं बुडवू शकतो, तेव्हा एका तेलाच्या थेंबाने त्याला उत्तर दिलं - 'मी बुडत नाही, मी तरंगतो कारण मी हलका आहे, आणि हलकं असणं म्हणजे कमजोर असणं नव्हे'.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बर्फ पाण्यावर का तरंगतो?

बर्फ पाण्यावर तरंगण्यामागे पाण्याचा एक खूप वेगळा आणि महत्त्वाचा गुणधर्म आहे. आपण शाळेत शिकलो की थंड केल्यावर पदार्थ आकुंचन पावतात आणि त्यांचा घट्टपणा वाढतो. लोखंड, दगड, तेल यांसारखे सगळे पदार्थ या नियमाला धरून चालतात. पण पाणी या नियमाला एक अपवाद आहे. पाणी चार अंश तापमानापर्यंत थंड झाले की ते आकुंचन पावते आणि त्याचा घट्टपणा सगळ्यात जास्त होतो. पण चार अंशाच्या खाली तापमान गेले की पाणी अचानक प्रसरण पावू लागते. याचे कारण पाण्याच्या सूक्ष्म कणांमध्ये आहे.

पाण्याचे कण म्हणजे दोन उदजनाचे आणि एक प्राणवायूचे कण एकत्र येऊन बनलेले असतात. या कणांमध्ये एकमेकांना ओढून धरणारी शक्ती असते, तिला उदजन बंध म्हणतात. जेव्हा पाणी शून्य अंशाला गोठून बर्फ होते तेव्हा हे उदजन बंध कणांना एका ठराविक खुल्या रचनेत बांधून ठेवतात. ही रचना मधमाशीच्या पोळ्यासारखी सहा कोनांची असते आणि तिच्यामध्ये बरीच मोकळी जागा असते. साध्या पाण्यात कण एकमेकांच्या जवळ सरकू शकतात, पण बर्फात ते या खुल्या रचनेमुळे लांब लांब स्थिरावतात. परिणामी बर्फाने व्यापलेली जागा त्याच वजनाच्या पाण्यापेक्षा सुमारे नऊ टक्के जास्त होते. जन तेवढेच पण जागा जास्त, म्हणून बर्फाचा घट्टपणा पाण्यापेक्षा कमी होतो.

एखादी वस्तू द्रवात टाकली की ती किती वर येईल हे तिच्या आणि त्या द्रवाच्या घट्टपणावर अवलंबून असते. कमी घट्टपणाची वस्तू जास्त घट्टपणाच्या द्रवात तरंगते.

बर्फाचा घट्टपणा पाण्यापेक्षा कमी असल्यामुळे तो पाण्यावर तरंगतो. त्याचा जवळपास नव्वद टक्के भाग पाण्याखाली असतो आणि फक्त दहा टक्के भाग बाहेर दिसतो.

हिमनगसुद्धा याच कारणामुळे समुद्रात तरंगतात. या गुणधर्मामुळे निसर्गाचे खूप मोठे संरक्षण होते. हिवाळ्यात तलावाचे वरचे पाणी गोठून बर्फाचा थर तयार होतो. हा बर्फाचा थर खालच्या पाण्यासाठी एक गोधडीसारखे काम करतो आणि खालचे पाणी चार अंश तापमानाला द्रव स्थितीत राहते. त्यामुळे मासे, वनस्पती आणि इतर जलचर जीव जिवंत राहतात. जर बर्फ पाण्यात बुडाला असता तर तलाव तळापासून गोठत गेले असते आणि सगळे जीव नष्ट झाले असते. म्हणून पाण्याचा हा विचित्र गुणधर्म पृथ्वीवरील जीवनासाठी वरदानच ठरला आहे.

### गर्विष्ठ दोरखंड


एका गावात खूप मोठा दुष्काळ पडला होता. गावातली सगळी तळी, ओढे आटले होते. फक्त गावाबाहेर एक जुनी खोल विहीर होती, तिलाच थोडेफार पाणी होते. गावकरी रोज तिथे पाणी भरायला जात. विहीर खूप खोल होती म्हणून बादलीसाठी एकच मोठा जाड दोरखंड होता, जो सगळे गावकरी आळीपाळीने वापरत. त्या दोरखंडाला खूप गर्व झाला होता. तो रोज स्वतःशी म्हणायचा, बघा, मी किती महत्त्वाचा आहे. मी नसेन तर कोणालाच पाणी मिळणार नाही. लोकांचे जीव माझ्यामुळे वाचत आहेत. या गावात माझ्याएवढा उपयोगी कोणीच नाही. तो विहिरीच्या काठावर पडलेल्या छोट्या खड्यांना, मातीला तुच्छ लेखू लागला.

एक दिवस पाणी काढताना तो दोरखंड एका दगडावर घासला गेला आणि त्याचा एक धागा तुटला. दोरखंडाला वाटले एक धागा तुटला तरी काय फरक पडतो, मी अजून भक्कम आहे. पण रोज तोच प्रकार होऊ लागला. हळूहळू त्याचे धागे एक एक करून झिजून तुटू लागले.

काही दिवसांनी एक म्हातारा आजोबा पाणी काढायला आले. त्यांनी बादली भरून वर ओढली, आणि नेमका त्याच वेळी तो जीर्ण झालेला दोरखंड मध्येच तुटला. बादली धाडकन खाली पडली, सगळे पाणी वाया गेले. आजोबा पडता पडता वाचले. सगळे गावकरी धावत आले. तेव्हा एक शहाणा माणूस म्हणाला, हा दोरखंड रोज आपल्याला पाणी देत होता हे खरे, पण त्याला गर्व झाला की तो एकटाच महत्त्वाचा आहे. त्याने स्वतःची काळजी घेतली नाही, त्याला कुठे घासले जातेय हे पाहिले नाही. आणि आपणही त्याच्यावर सगळी भिस्त ठेवली, दुसरा दोरखंड तयारच ठेवला नाही. कोणतीही एकच गोष्ट कायम टिकत नाही. काळानुसार झीज होतेच. लगेच गावकऱ्यांनी वर्गणी काढून तीन नवीन दोरखंड आणले. एक वापरायला, एक बाजूला ठेवायला आणि एक राखीव. त्यांनी विहिरीच्या काठावर गुळगुळीत लाकूड बसवले म्हणजे दोर घासणार नाही.

तात्पर्य : आपण कितीही मोठे किंवा महत्त्वाचे झालो तरी गर्व करू नये, कारण काळापुढे सगळे नगण्य आहे. स्वतःमध्ये सुधारणा करत राहणे, स्वतःची काळजी घेणे आणि नेहमी पर्याय तयार ठेवणे खूप गरजेचे असते. एकाच व्यक्तीवर, एकाच गोष्टीवर अवलंबून राहिलो तर अडचणीच्या वेळी नुकसान होते.

## जीवन का अमृत (भाग १)



स्वेच्छा से हम कुछ भी पवित्र उद्देश्य के लिए दें। पहले आप अपने सांसारिक कार्यों के लिए खर्च करें, फिर अपने बुढ़ापे के लिए, अगर कुछ बचा सकें, तो जरूर बचाएँ। इसके बाद अगर आपके पास कुछ बच जाए, सेवा में देने के लिए, तो आप दे सकते हैं।

***

६४. इंसान में महान संभावनाएँ छुपी हुई हैं। उसे तीन आर्शीवाद मिले हैं। वह शरीर, बुद्धि और आत्मा रखता हैं। आत्मा, इंसान और हर जगह व्याप्त प्रभु के बीच की कड़ी है और यह शरीर तथा बुद्धि, दोनों को ताकत देती है। इंसान के यह तीनों पक्ष पूरी तरह विकसित होनें चाहिएँ ।

### एक आज्ञाकारी

***

६५. एक आज्ञाकारी और प्रिय शिष्य को मौत का कोई डर नहीं होना चाहिए। यह (मौत) सिर्फ हमारे कार्यस्थल को बदलेगी, हमारी भलाई के लिए, जब तक कि हम अपने परम् लक्ष्य को नहीं पा लेते ।

६६. अंतर में सच्ची विरक्ति केवल शब्द से जुड़कर ही मिलती है प्रकृति और उसकी सारी सुंदरता एक त्यागी को लुभाना बंद कर देती है । हर वस्तु का त्याग करके, साधक हर जगह व्याप्त प्रभु में समा जाता है। उसका वातावरण से मोह खत्म हो जाता है और जड़ता से उसकी आसक्ति समाप्त हो जाती है। इस प्रकार वह जन्म-मरण के चक्र से छूट जाता इसके बाद, इंद्रियों के भोग-रस और संसार की चमक-धमक उसे भाती नहीं है, क्योंकि वह प्रभु के रास्ते पर चल रहा होता है।

६७. कृतज्ञता उस दिल के लिए शक्तिवर्धक का काम करती है, जिसमें नम्रता, प्रेम और भक्ति का वास हो ।

सत्गुरु के प्रति और अधिक प्रेम की आपकी कामना शुभ है। उससे प्रेम करने के लिए आपको उसका कहा मानना होगा। जब तक हम प्रेम करना और आज्ञा मानना नहीं सीखते और अपने जीवन को नहीं बदलते, तब तक सत्गुरु का वरदान उस बीज की तरह है जो कि लोहे के तहखाने में बंद हो और अंकुरित होकर फल-फूल नहीं सकता हो ।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

असल्याची चिन्हं आहेत. आता तुम्ही प्रेम आणि मान देऊन त्यांना बरं कराल की त्यांच्यासारख्याच प्रतिक्रिया द्याल?

सुरेश ओबेरॉय : मी त्यांना बरं करायचा प्रयत्न करेन.

शिवानीदीदी : त्यांना बरं करण्यासाठी तुम्ही कसं असलं पाहिजे?

सुरेश ओबेरॉय : स्थिर.

शिवानीदीदी : इतर लोक आजारी आहेत म्हणूनच आपण आजारी पडू शकत नाही. आपण अनेक लोकांमध्ये वावरत असू आणि एखाद्या मोठ्या संघटनेचा भाग असू; तरीदेखील आपलं त्यांच्या बरोबरचं समीकरण तसंच असेल जसं आपल्या कुटुंबातल्या तीन सदस्यांबरोबरचं. इतरांनी बदलावं म्हणून आपण थांबू शकत नाही.

सुरेश ओबेरॉय : लोक त्यांच्या नेत्याचं किंवा

### आपले अस्तित्व

एखाद्या अधिकाऱ्याचं ऐकतील पण प्रत्येक जण नेता बनू शकत नाही.

शिवानीदीदी : आपण एखाद्याच्या आज्ञा पाळतो कारण ती व्यक्ती अधिकारपदावर असते किंवा तिचा मान राखायचा म्हणून आपण तिचं ऐकतो. इथे त्या नेत्याच्या अस्तित्वाची अवस्था अधिक महत्त्वपूर्ण ठरते. त्याच्या पदामुळे लोक त्याचं ऐकतील पण जर का त्याचा त्याच्या मनावर ताबा नसेल आणि तो स्वतःचं ऐकत नसेल तर? तर आपण त्याला नेता म्हणू शकतो का?

सुरेश ओबेरॉय : हो, सर्वप्रथम आपल्याला स्वतःचा ताबा घ्यायला हवा.

शिवानीदीदी : कधीकधी आपण असं काही बोलतो जे आपल्याला बोलायचं नसतं यावर आपण सुरुवातीला चर्चा केली. आपली जीभच आपल्या आज्ञा पाळत नाही. पण इतरांनी आपल्या म्हणण्याप्रमाणे वागावं असं आपल्याला वाटतं. हे कसं शक्य आहे? इतरांवर नियंत्रण मिळवून आपली शक्ती निर्माण होते असं यातून दिसतं. त्यांच्या छोट्याशा चुकीनेही आपण अस्वस्थ होतो. त्यामुळे हे इतरांच्या बाबतीत नाही तर आपल्या स्वतःच्या बाबतीत आहे.

सुरेश ओबेरॉय :

आपली पाच इंद्रियं आहेत. त्यांच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी आपण कष्ट घ्यायला हवेत का?

शिवानीदीदी :

नाही, आपल्याला फक्त आपण काय विचार करतो ह्याची काळजी घ्यायची आहे.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

राजू : यार, काल माझं पाकीट हरवलं, त्यात ५ हजार होते.
विजू : अरे देवा! मग सापडलं का?
राजू : नाही रे, पण समाधान एवढंच की मी घरी येऊन बघितलं तर पाकीट जागेवरच होतं... ५ हजार मात्र गायब!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* देशातील पहिला एआय आणि रोबोटिक्स टेक्नॉलॉजी पार्क कोठे आहे?
– बंगळूरू

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद – आरोग्य संवर्धन

### कांदा

४) कांदा हा उष्ण गुणाचा नसल्याने व शीतवीर्यात्मक असल्याने ग्रीष्म (उन्हाळा) ऋतूचा त्रास होऊ नये म्हणून या ऋतूत कांद्याचा वापर आहारामध्ये जास्त प्रमाणात करावा. या ऋतूमध्ये कांदा भाजून खाणे किंवा इतर पदार्थांबरोबर खाणे हे सर्वच चांगले, परंतु तरीही कच्चा कांदा खाणे अधिक लाभदायक असते.५) कांद्याची भाजी, कोशिंबीर किंवा नुसता कांदा खाल्ल्यानंतर त्याचा उग्र वास इतरांना येऊ नये म्हणून थोडा गुळाचा तुकडा तोंडात चघळावा किंवा धण्याची डाळ व बडीशेप खावी. यामुळे तोंडाला कांद्याचा वास येत नाही.६) आयुर्वेदानुसार कांदा एक उत्तम रसायन, श्रेष्ठ औषध व पौष्टिक आहार आहे. त्यामुळे शरीर बलवान, निरोगी राहण्यासाठी व प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी कांद्याचा नियमित वापर करावा.७) कांदा वात, पित्त आणि कफ या तीनही दोषांच्या विकारांवर गुणकारी आहे. कांद्याच्या सेवनाने वातशमन होते. पित्तप्रकोप कमी होतो आणि कफ नाहीसा होतो.८) कांद्याच्या सेवनाने आतड्यांची हालचाल वाढून कार्यशक्ती वाढते व त्याच्या रेचक गुणधर्मामुळे पोट साफ होण्यास मदत होते.९) कांद्याचे ताजे लोणचे बनवून खाल्ल्याने तोंडास रुची उत्पन्न होते. अग्नी प्रदीप्त होऊन अन्नपचन होते.१०) डोळ्यांची आग होत असेल, तसेच डोळे आलेले असतील, तर सकाळ-संध्याकाळ दोन-तीन थेंब रस डोळ्यांत घालावा.११) हृदयरोग, अति रक्तदाब, तसेच हाय कोलेस्टेरॉल असणाऱ्यांनी नियमितपणे कच्चा कांदा खावा. याच्या सेवनाने हे सर्व आजार कमी होतात.१२) मधमाशीच्या दंशाने आग होत असेल, तर दंशाच्या ठिकाणी कांद्याचा रस चोळल्यास तेथील दाह कमी होतो.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आपल्या वास्तु तले अग्नीतत्व

मनुष्याच्या जन्मानंतर तो रडतो, म्हणजेच त्याच्यात चेतना तयार होते किंवा जागृत होते. हे सगळं निमिषांत घडत असतं. सर्व धर्मांमध्ये सर्व कर्मांमध्ये असाधारण महत्त्व हे अग्नीलाच आहे. शरीरात हा अग्नी चेतनेच्या स्वरूपात आहे. त्याचं मुर्त स्वरूप म्हणजे आपली दृष्टी.

दिशांमध्ये उर्जा आहे. वास्तुशास्त्रात आणि सर्वच भारतीय विचार धारेला घड्याळाच्या मार्गाने प्रवाह असणे म्हणजे क्लॉकवाईज परिणामांचा विचार आहे. पूर्वेत अग्नीतत्व असले तरी त्या अग्नीचे बळ मात्र पूर्व आणि दक्षिण दिशेमध्ये असलेल्या अग्नेय दिशेत आहे. साधारणपणे या अग्नीमध्ये आपण विस्तव असाच अर्थ घेतो. पण खरंतर शास्त्रामध्ये अपेक्षित असलेला अग्नी म्हणजे खरंतर चेतना, नेतृत्व करणारा, पुढे येणारा, दूरदृष्टी असणारा.

आपल्या शरीरातल्या मणिपूर चक्राशी संबंधित असलेल्या या तत्वाचा विचारसुध्दा चेतना देणारा असाच आहे. दृष्टीशी संबंधित असलेले हे चक्र अग्नीतत्वाचे करते.

वास्तुशास्त्रात हेच अग्नीतत्व पूर्व आणि दक्षिण या दोन दिशांमध्ये वसले आहे. या दिशेवरूनच एखादे कार्य कसे आणि किती पुढे जाईल याचा अंदाज वर्तवता येतो. अग्नी म्हणजे चेतना, पण ती अशी चेतना की आपल्या संपूर्ण क्षमतेचा वापर करून ती कार्यरत करणारी, कार्यरत ठेवणारी उर्जा म्हणजे अग्नितत्व. अग्नी म्हणजे प्रकाश. जो सर्वदूर पसरतो आणि त्याच्यापासून काही लपून रहात नाही. म्हणजे अग्नी हा बरे-वाईट जाणणारा सुद्धा आहे. ज्ञान आहे. अग्नी म्हणजे ऐश्वर्य, तिक्ष्ण बुद्धी, शरीरसंपदा, देवाण- घेवाण, प्रवास, पुरूषांचे वीर्य, स्त्री बीज, चयापचयाची क्रिया, संतती, क्षमता, शोध, बुद्धी मुळापर्यंत जाऊन अभ्यास करणारी बुद्धी किंवा संशोधन करणारे म्हणजेच तर्कबुध्दी. संशुध्दीचे स्थान, वासना, भौतिक सुख प्रदान करणारे नांव.

अग्नी तत्वात जी चेतना आहे, त्यामुळे कोणत्याही संभाषणांचे घटनांचे रूप आधी डोळ्यात दिसते. त्यामुळे चेतना जागी होते. एक नेतृत्व शक्ती जागी होते. पृथ्वी तत्वाची सुरूवात याच अग्नीतत्वातून होते. आपले सर्व चक्र जीवनमान हे पृथ्वी तत्वाशीच निगडित असल्यामुळे पर्यायाने याच अग्नीतत्वाचा विचार हा प्रत्येक श्री गणेशाला होतो.

अग्नी म्हणजे पित्त. पित्त खवळले म्हणजे अग्नीतत्वाचे तांडव शरीरात दाखवतो. ज्या कुंडलीत या अग्नीराशीत म्हणजे मेष, सिंह, धनू या राशीत पापग्रहांचे आणि मंदगती ग्रहांचे भ्रमण चालू असते, तेव्हा त्या वास्तूत या अग्नेय दिशेत दोष असतो, त्या वेळेला अशा वास्तुतल्या लोकांच्या आयुष्यात काही विचित्र घटना अनुभवायला मिळतात.

मेषेचा अग्नी ही एक प्रकारची ठिणगी आहे. मंगळ आहे. ठिणगी पडली तर सगळे पेटून उठते. तसेच काही बुद्धीवान लोकांना छोटासा क्यू मिळाला की त्यांच्याकडून दिव्य काम होते. क्लू ही बौध्दिक ठिणगी आहे. म्हणजेच कोणत्याही कामाचे किंवा प्रोजेक्टचे महाकाय स्वरूप जे असते, त्याची सुरवात छोट्याशा घटनेतून झालेली असते. तीच ठिणगी, तेच मनुष्याला अंतःप्रेरणा जागृत करणारे अग्नीतत्व, ज्या वास्तुत या अग्नीतत्वाचे योग्य नियमन झालेले असते, त्या वेळेला हाच अग्नी ज्ञान, आरोग्य आणि ऐश्वर्य प्राप्त करून देण्याला समर्थ ठरतो.

सिंहेचा अग्नी हा अहंकारी आहे. भला तो वादी असेल, सत्यवादी असेल, प्रयत्नवादी असेल पण एक प्रकारे सूर्यच ह्या अग्नीचे नेतृत्व गुण दाखवतो. विशेष चमक असलेली ही अग्नी तत्वाची रास कोणत्याही पापग्रहांनी बिघडली गेली असेल तर त्याचे प्रतिबिंब त्या वास्तुत दिसते. अशा वेळेला या व्यक्तीतला फाजील आत्मविश्वास, फाजील अहंकार त्याच्या र्हासाला कारणीभूत ठरतो. या सूर्याचा विचार केला तर त्याचा एक किरण या पृथ्वीवरचा अंधार नाहीसा करतो. म्हणजेच सिंह राशीतले अग्नीतत्व हे सूर्यासारखे प्रकाशमान, सगळं काही सत्य खुले आम जगासमोर आणणारे आहे., ऐश्वर्य दायी आहे, सत्यवचनी आहे.

धनुत अग्नीतत्व हे प्रमाणबद्ध मार्गदर्शक आहेत. प्रमाणबध्द अशासाठी म्हटले की, गुरू जसा जलात प्रसवशील आहे तसा अग्नीत तो अनावश्यक ते शोषून घेऊन उपयोगी ते सर्व काही देणारा आहे. धनुराशीतले अग्नीतत्व पूर्णतः नेतृत्व करणारे नसले तरी नेतृत्वाचे सर्वजण अंगी असल्यामुळे ते योग्य नेतृत्वाला सहाय्य करणारे असे अग्नीतत्व आहे. म्हणजेच सर्व काही जाणून ज्ञानमयी असणारे मार्गदर्शी आहे. या धनुराशीच्या अग्नीतत्वात मेषेची बुद्धी आहे. सिंहेचा अहंभाव किंवा आत्मविश्वास आहे आणि स्वतः ची विचारशक्ती जागृत आहे.

वास्तुशास्त्रातसुध्दा या अग्नेय तत्वातले देवता मंडळाचे मुळ सवित्र आणि सावितृ या देवतांमध्येच दडले आहे. त्यामुळे वास्तुशास्त्रीय उपाय योजना करताना अंतरिक्षा, अनिल पुष्प तसेच सवित्र आणि सावितृ यांचा विचार न करणे हे वेडेपणाचे ठरेल. वैदिकशास्त्रात या सर्व देवतांचा, उर्जांचा, तत्वांचा जाणीवपूर्वक विचार केला आहे. पूर्व दिशेचा प्रगुण सुरूवात हा अग्नी तत्वाचाच असला तरी त्या सुरुवातीला पुढे रेटणे, शक्ती देणे, बळ देणे ह्याचे काम मात्र या अग्नीतत्वाचेच आहे.

पृथ्वीच्या उत्पत्तीला कारक असलेला अग्नी मनुष्याच्याबाबतीतही तीच भूमिका ठेवतो. प्रजननाला आवश्यक असलेले अग्नीतत्व आपल्या शरीरात मणिपूर चक्राच्या माध्यमातून विरजते. आपल्या शरीरातील चयापचयाची क्रिया चालवत उर्जेचे शक्तीमध्ये रूपांतर करण्याचे काम या मणिपूर चक्राचे असते. भौतिक सुखासाठी सुरूवात डोळ्यांनी होते. त्यातून लालसा किंवा हाव निर्माण होऊन मनुष्य त्या भौतिक सुखासाठी धडपडतो. अग्नीचे उब आणि राख ही दोन्ही स्वरूपं आपण बघतो, अनुभवतो. अग्नीची उब आकर्षण, प्रेम, विश्वास, वात्सल्य अशा स्वरूपातून अनुभवतो तर भडकलेला अग्नी हा ज्वाला स्वरूप आहे. त्याचा अनुभव आपण तिरस्कार, मत्सर, क्रोध, लोभ या स्वरूपातून अनुभवतो. अग्नीची उब सर्व कामांचे संतुलन, नियमन करून एक प्रकारची सत्ताच शरीरावर गाजवतो आणि ते ही खरंच आहे. कारण आपण म्हणतो ना.. पित्त खवळंल तर.....

सूर्याचे अधिष्ठान असलेले हे मणिपूर चक्र आत्मसम्मान आणि आत्मविश्वास साधण्याला तसे सहाय्यक ठरते. कारण सूर्य हा आपण आत्मकारक ग्रह असलेला आहे. त्याला पित्याचे रूप, मार्गदर्शक रूप, वाचा आणि सत्यतेचा गुण हे आपणच दिले आहेत आणि अनुभवले आहेत.

**– कौस्तुभ काळे, वास्तुवाचस्पति,**
**मोबा. ९८५०९४१८८१**

# प्रेरणादायी अक्षरधन

## दुःखाचे गाणे येते कैसे







काचेचा तुकडा उन्हाची तिरीप आली की केवढा चकाकतो। पण म्हणून का तो हिऱ्याच्या भावात खपतो? पण खरे गुण कळायला वेळच लागतो. पुष्कळदा आपणच भोळसटपणे त्यावर ते गुण लादतो किंवा कधी कधी गुण न ओळखताच त्या वस्तूला एकदम झिडकारतो. मागाहून तिचं मूल्य कळलं की मग मात्र हळहळतो. जीवनाचंही असतं. त्याचं खरं स्वरूप कळतच नसतं. ते कधी आनंद देतं तर कधी दुःख लादतं. एका संस्कृत महाकवीनं म्हणूनच जीवनाबद्दल म्हटलंय,

कधी कधी काळ कसा सुखात जातो। पण कधी नुसतीच कटकट कानी पडते. नशा चढल्यासारख भांडण जुंपतं का आणि काय भांडतोय याचे भानच नसते. कधी कधी वीणेचे मंजुळ स्वर कानी पडतात. मग लोक काळ कसा आनंदात घालवतात. पण कधी कधी त्यांचंच करुण क्रंदन कानी पडतं? का तसं घडतं? ती घडी एकदम जीवनाचा रंग पालटते. कधी कधी फिरावं रस्त्यानं, तर एखादं रम्य रूप आनंद देतं. क्षणातच थोडं पुढं गेलं की गलितगात्र जराजर्जर शरीर डोळ्यांना शिणवतं. हृदय कसं गलबलून जातं. मनात नैराश्य, वैफल्य भिनतं आणि ते दुःखद दृश्य अंतकरण पिळवटून काढतं. मग वाटतं, की हे जीवन अमृतमय आहे की विषमय ?

अरे माणसा, हे तुझं वाटणं, मनाच्या अस्थिरतेचं लक्षण. मन स्वच्छ ठेवावं. दिसतं ते सहज मानावं. तारुण पाहून मोहरावं, तसेच म्हातारपणाला न घाबरावं. का? तर या सगळ्या सहज अवस्थांना समजून घ्यावं. जीवन अमृतमय आहे. ते अमृमयच राखावं. हे राखणं स्वाधीनच असतं. हे लक्षात ठेवावं वृत्तीत आणि विचारांत तसं तारतम्य बाणवावं. विष पचवण्याचं सामर्थ्य बाणवून स्वत:च नीलकंठ व्हायचं. संत निवृतिनाथ म्हणतात, आपण जीवनाचं आनंदघन स्वरूप जाणलं पाहिजे, टिकवलं पाहिजे.

जीवनात वाकडं पाऊल पडलं, भलत्याच मार्गाला लागलं. हे आपलंच चुकलं. कुणी का तुम्हाला तसं बळजबरीनं करायला लावलं? छे तुमच्या दुःखाचं तुम्ही कारण.

एक होता शिंपी. सकाळी दुकानाकडं जायचा. किल्लीनं कुलूप काढायचा. दुकानातली प्रसन्नता लुटायचा. लोकांचे शिवलेले रंगीबेरंगी कपडे टांगलेले. सुखवायचे डोळ्यांना ते. नवे शिवलेले कपडे न्यायला आलेले चेहरे कसे टवटवीत असायचे. फुललेले. ते शिलाई द्यायचे, आनंद घ्यायचे. शिंप्यालाही आनंद द्यायचे, पैसे तर मिळायचेच, पोटासाठी. पण रोज आनंद किती बांधायचा गाठी। मग यायचा हुसेन चाचा. सगळ्या गावाच्या बातम्या पुरवायचा. शिलाई यंत्र आणि त्याबरोबरच गप्पात रंगणारं तोंड दिवसभर चालायचं. दिवसभर नुसती आनंदाची देवाणघेवाण, सुखाची, समाधानाची, प्रसन्नतेची कधीच नाही जाणवायची वाण.

पण एकदा कुणीतरी शिंप्याला लॉटरीचं तिकिट घ्यायला लावलं आणि नशिबानं ते तिकिट लाभलं. शिंप्याला लाख रुपये देऊन गेलं. लाख रुपये, आता कशाला हवी शिवण्याची कटकट? आनंद लुटायचा फुकट. त्यानं दिली फेकून ती दुकानाची किल्ली दूर भिरकावूनं।

आता संगतच बदलली. आता झाले गोळा सगळे छंदीफंदी. घ्यायचं लागलं व्यसन. नको त्या व्यसनांनी शरीर खंगलं नको त्या वासनांनी रोग जडले:

आता पश्चात्तापाशिवाय काय उरलं? आला कसाबसा दुकानापाशी.

झटापट करायला लागला कुलुपाशी ते उघडायला. आत ठेवलीय ना ठेव बंद करून? आनंदाची, समाधानाची, शांतीची! पण काय उपयोग? किल्ली कुठंय ती? मागंच केव्हातरी ती त्यानं भिरकावून दिली होती. **– किशोर गांधी**

# मुलांना सुट्टीमधे बालनाट्यांची मेजवानी; नवीन दोस्तांबरोबर उमगणार आनंदाचा व आठवणींचा खजिना



नगर – बहुरंग व्हिज्युअल आर्ट्स फाऊंडेशन, पुणे आणि ऊर्जा रंगभवन, अहिल्यानगर आयोजित खजिना आणि तू दोस्त माझ्या या दोन बालनाट्यांचे आयोजन अहिल्यानगर येथे होत आहे.

सदगुरू श्री शंकर महाराज यांचे जीवनचरित्रावर आधारित असलेल्या जय शंकर या चित्रपटाचे दिग्दर्शक शेखर नाईक यांनी माधुरी पुरंदरे यांच्या कथेवर आधारित खजिना आणि विभावरी देशपांडे लिखित 'तू दोस्त माझ्या' ही दोन बालनाट्ये दिग्दर्शीत केली केली आहेत.

खजिना ही गोष्ट आहे खजिन्याच्या गुपिताची. चुटकीच्या बाबांची आणि चुकीची. या खजिन्यात नक्की काय दडलयं? पहायलाच हवं!

तू दोस्त माझ्या या नाटकात नाईक यांनी लहान मुलांच भावविश्व अगदी सहजपणे आणि संवेदनशीलतेने अलगद उलगडून दाखवले आहे. आपल्या कुशल दिग्दर्शनाने बालकलाकारांकडून अतिशय सुरेख आणि संयत अभिनय त्यांनी करून घेतला आहे. सर्वच कलाकारांनी आपापल्या व्यक्तीरेखांना उत्तम न्याय दिला आहे. मुख्य मुलगी, तिचे आई बाबा, रघु, तानाजी या व्यक्तीरेखा तर नाटक संपल्यावर देखील आपल्या बरोबरच राहतात या नाटकात नगरचा नातू चि. विहान राजकिरण हा तानाजीची भुमिका साकारत आहे.

नाटकातील अर्थपूर्ण गाणी, संगीत, प्रसंगांची मांडणी आणि कलाकारांचा अभिनय असलेल हे नाटक म्हणजे एक सुंदर जमलेली भट्टीच. म्हणूनच अतिशय हलक्या फुलक्या पद्धतीने मनाला भिडणारा एक संदेश देणारं हे नाटक पहायलाच हवं!

या नाटकांचे पुणे, मुंबई, नाशिक, आनंदवन, चंद्रपूर, किर्लोस्कर वाडी, श्रीगोंदा, नागपूर, हिंगणघाट, स्नेहालय इत्यादी ठिकाणी अनेक प्रयोग झाले आहेत. या दोन्ही नाटकांतील सर्वच बालकलाकार अतिशय सुंदर अभिनय करत असून तो पाहण्याची उत्तम संधी नगरच्या नाट्यरसिकांना आयोजकांनी उपलब्ध करून दिली आहे.

या दोन्ही बालनाट्यांचे प्रयोग ऊर्जा रंगभवन, एकता कॉलनी, केडगांव देवी रोड, येथे २४ मे रोजी सकाळी १० वाजता आणि दुपारी ४ वाजता अशा दोन वेळा हे नाट्यप्रयोग सादर होणार आहेत. रसिकांनी आपल्या सोयीनुसार या बालनाट्याचा आनंद घ्यावा असे आवाहन शेखर नाईक यांनी केले आहे.

प्रवेशिकेसाठी – ७५५८३६२०३६. (शेखर नाईक, बहुरंग, पुणे) या क्रमांकावर कृपया संपर्क साधावा असे श्री. नाईक यांनी सांगितले.

# सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी सुविधा केंद्र सुरू



सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष प्रवेशासाठी सुरु असलेले सुविधा केंद्र.

नगर – महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी डिप्लोमाची प्रवेश प्रक्रिया २० मे पासून सुरू होत आहे. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी सौ. सुंदरबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निक येथे प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (FC Code : 5354) २० मे पासून सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या प्रवेश प्रक्रियेनुसार विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी, प्रवेशासंदर्भातील मार्गदर्शन तसेच विविध शासकीय योजनांची माहिती या सुविधा केंद्रामार्फत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

पॉलिटेक्निकचे प्राचार्य डॉ. आर. एस. गडाख यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेमध्ये कोणतीही अडचण येऊ नये यासाठी अनुभवी प्राध्यापक व तांत्रिक सहाय्य उपलब्ध करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह सुविधा केंद्राला भेट देऊन प्रवेश प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात आले आहे.तसेच, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, शाखा निवड आणि प्रवेशासंदर्भातील सर्व माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. याशिवाय, विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार असून अर्जामधील त्रुटी टाळण्यासाठी विशेष सहाय्य दिले जाणार आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना संगणक सुविधा तसेच इंटरनेटची सोय विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शासनाच्या शिष्यवृत्ती व फी सवलत योजनांची माहिती देखील देण्यात येणार आहे. पालक व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी स्वतंत्र समुपदेशन व्यवस्था करण्यात आली आहे. साकेश्वर ग्रामीण विकास सेवा संस्था ही विद्यार्थ्यांच्या सेवेत २०१० पासून तंत्रशिक्षणामध्ये अग्रेसर असलेली संस्था असून संस्थेच्या प्रगतीचा आलेख बघता आज विद्यार्थ्यांना बस सुविधा, सुसज्ज कॅम्पस मध्ये मुला- मुलींसाठी स्वतंत्र होस्टेल सुविधा, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन व विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक समस्या व प्रगती जाणून घेण्यासाठी मेंटर मेन्टी उपक्रम याच संस्थेत गेल्या कित्येक वर्षापासून यशस्वी राबविण्यात आलेला आहे त्याचाच परिणाम म्हणून दरवर्षी संस्थेचा उच्चांकी निकाल लागत आहे. म्हणूनच सौ. सुंदराबाई माणिक आडसूळ पॉलिटेक्निकला महाराष्ट्र राज्य तंत्रनिकेतन मंडळाचा अति उत्तम श्रेणी प्राप्त झालेली आहे. गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षणासोबत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिरुद्ध आडसूळ यांनी सांगितले.



साज क्रिएशन या प्रोडक्शन हाऊस निर्मित 'नगर फाईल्स' वेबसिरीजचे चित्रीकरणप्रसंगी कलाकार.

# वेबसिरीजचे चित्रीकरण नगरमध्ये सुरु

नगर – अहिल्यानगरमध्ये साज क्रिएशन या प्रोडक्शन हाऊस निर्मित गुन्हेगारी विषयावरील काल्पनिक तत्वावर NAGAR FILES ही वेब सिरीज लवकरच आपल्या भेटीला येत आहे. अहिल्यानगर शहर आणि आसपासची गावे जसे की निंबळक, चांदबिबी महाल, चास, नागापूर, या ठिकाणी या वेब सिरीजचे चित्रीकरण सुरू आहे. कबीर राज लिखित व दिग्दर्शीत आणि सागर खिस्ती सह दिग्दर्शित या वेब सिरीजचे एकूण २२ भाग प्रदर्शित करण्याचं नियोजन आहे. या वेबसिरीजचे दोन भागाचे चित्रीकरण झालं आहे. प्रदीप शिरसाट छायाचित्रण, आणि प्रमोद सोनवणे या सिरीजचे संकलन करीत असून, लवकरचं त्याचा पहिला भाग प्रदर्शित होईल असे सांगण्यात आले आहे.

या वेब सिरीज मध्ये कबीर राज, जय खुडे, जे. बी.शिंदे, विशाल कुटे, तुलसी पुरी, तुकाराम पुरी, अविनाश कराळे, ख़ुशी घटाने, अनिकेत भुजंग, समृद्धी खिस्ती, अश्विनी वसगडेकर, गौरी देशट्टी, ललित काळे, ज्योती खिस्ती, सागर खिस्ती, बालकलाकार सृजन वराडे, तसेच इतर कलाकारांनी भूमिका केल्या आहेत.



एनआरआय वर्ल्ड ऑफ अहिल्यानगरचा स्नेहमेळाव्यात ८० पालकांनी उपस्थिती लावली.

# एनआरआय वर्ल्ड ऑफ अहिल्यानगरचा स्नेहमेळावा

यगर – नगरमधील ज्या पालकांचे मुले, मुली, सुना व जावई परदेशात आहेत अश्या पालकांचा एनआरआय वर्ल्ड ऑफ अहिल्यानगरचा स्नेहमेळावा नुकताच अहिल्यानगर येथील सावेडी भागातील हॉटेलमध्ये पार पडला. या मेळाव्यात ८० पालकांनी उपस्थिती नोंदवली. यांच्या व्हाट्सअप ग्रुपची निर्मिती साडेसहा वर्षांपूर्वी झालेली आहे. सर्व प्रथम गणेश पूजन झाले. प्रा. संगीता भागवत यांनी झालेल्या स्नेहमेळाव्याची सविस्तर माहिती दिली व कार्यक्रमाचे पूर्ण सूत्रसंचालन केले.

डॉ. शामा मंत्री यांनी विविध उपक्रमाचे नियोजन करण्यासाठी ग्रुप तयार करण्याची सूचना मांडली व ग्रुप तयार केले.

डॉ. दत्ता पोंदे यांनी मुला- मुलींच्या परदेशात नोकऱ्या गेल्यास काय काय उपाययोजना करता येतील याविषयी माहिती सांगितली. तसेच आपल्या ग्रुप मधील मुला मुलींच्या ज्ञानाचा फायदा नगर मधील विद्यार्थ्यांना करून देण्याकरता कॉलेज भेटी घेण्याच्या मनोदय व्यक्त केला.

नवीन उपस्थित सदस्यांनी आपआपली ओळख करून दिली व आपली मुले-मुली परदेशात कशी गेली व कुठे गेली याची माहिती दिली. काही पालकांनी परदेशात आलेले वेगवेगळ्या अनुभवांचे कथन करत त्याविषयी सुद्धा दुसऱ्या पालकांना मार्गदर्शन केले.

सविता धर्माधिकारी यांनी आभार प्रदर्शन केले. सर्वांनी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अविनाश कुलकर्णी, मिनाक्षी पाठक, स्मिता फडके यांनीही प्रयत्न केले. नगर शहरातील व जिल्ह्यातील ज्या नागरिकांचे जवळचे नातेवाईक परदेशात आहेत किंवा चाललेत ते या व्हाट्सअप ग्रुपमध्ये जॉईन होऊ शकतात. त्यांनी ७३८७ ९०० ७०० या क्रमांकावर संपर्क साधावा. सामाजिक बांधिलकी जपणारा ग्रुप विनामूल्य आहे. कोणतीही नोंदणी वा सभासद फी नाही याची नोंद घ्यावी.

# ऊठ तरुणा जागा हो

आजचा तरूण ऊद्याचा भावी नागरिक आहे. तरूण वर्गाने अगोदर आपल्या स्वत:मधे चांगले विचार अंगीक्रुत करायला हवेत. चांगले वागणे आचरनात आणायला हवे थोरामोठ्याचा आदर करायला हवा. तुम्ही कितीही उच्चपदावर असाल तरी समोरच्या मोठ्या व्यक्तीकडे डीग्री नसेल तर त्यांची तुमच्या सोबत तुमच्या डिग्रीसोबत त्यांची तुलना न करता आपल्यापेक्षा ती व्यक्ती वयाने मोठी आहे म्हणून त्यांचा आदर करा. माणूस म्हणून त्यांचा आदर करा. आपल्या स्वत:मधे अनेक चांगले बदल आपण स्वत: चांगल्या विचारांनी घडवू शकतो. आपण चांगल्या विचारांनी विकसित झालो कि गावाचादेखील आपण चांगला विकास करू शकतो. गाव सुधारला कि तालुका पातळीवर आपण चांगले काम करू शकतो नंतर जिल्हापातळी मग राज्यपातळी आणि नंतर देशपातळीवर हा तरूणवर्ग खुप चांगल्या पद्धतीने काम करू शकतो. हे सगळं जरी खरे असले तरी आजचा तरूणवर्ग हा स्वत:लाच विसरत चालला आहे. आणि नको त्या गोष्टींमधे स्वत:चा अमूल्य वेळ खर्ची घालत आहे. अनेक तरूण मुले स्वत:च्या घरच्या परिस्थिवर लक्ष न देता फक्त स्वत:पुरते टकाटक राहून जगताना दिसून येत आहेत. वय वाढत चालले तरी काहींना नोकरी नाही नोकरी नसल्यामुळे लग्नासाठी कुणी मुलगी देत नाही त्यामुळे असा तरुणवर्ग सध्या ताणतनावात जगताना दिसून येत आहे तर काही तरुणवर्ग या गोष्टींमुळे व्यसनाच्या आहारी गेलेला दिसून येत आहे. राजकीय लोकांच्या मागे काहीजण धावताना दिसत आहेत. पन जे ध्येयवेडे तरूण आहेत ते मात्र आपल्या करियरसाठी अभ्यासाचे कष्ट रात्रंदिवस घेऊन देशाचे ऊज्ज्वल भविष्य बनून शासकीय अधिकारी बनून सक्षम देश बनवण्यासाठी मेहनत घेत आहेत. ज्या घरातून बालसंस्काराचे धडे या मुलांना शिकवले जातात चांगल्या वाईटाची शिकवण या चिमुकल्या मुलांना दिली जाते लहाणपनापासून चुकिच्या गोष्टींपासून दूर ठेवले जाते अशी मुले करियर सोडून दुसरीकडे कधीच भरकटत नाही. परंतू अनेक तरूण मुलांनी स्वत:चे भविष्य अंधारात ठेवून राजकिय लोकांसोबत राहून स्वत:चे करियर बरबाद केले आहे. ज्या राजकिय लोकांनी जनतेच्या जिवावर निवडूण येऊन स्वत:चेच भविष्य ऊजळवले आहे अशा लोकांच्या फक्त सोबत रहायला मिळाले तरी आजचा काही तरूणवर्ग खुष आहे. स्वत:ची घरची परिस्थीती अत्यंत हलाखीची असते तरी या मुलांना फक्त आलिशान गाड्यांमधून फिरायला मिळाले हाँटेलमधे चांगले खायला मिळाले तरी हि मुले यातचं खूश असतात. खरं म्हणजे या मुलांसाठी हे छोटसं विश्व म्हणजे बेडकाच्या डबक्यासारखं आहे मोठे विश्व यांना बघायचेच नाही तेवढ्याच डबक्यात हि तरूणाई मर्यादित रहात आहे. पन हा तात्पुरता आनंद देनारा झगमगाट कालांतराने दुखः देनारा आहे हे तरूण मुलांनी विसरता कामा नये. या लोकांनी त्यांच्या अनेक पिढ्या बसून खातील एवढा बँकबँलन्स करून ठेवलेला आहे. यांचे अनेक वेगवेगळे बिझनेस असतात शाळा काँलेज सुरू करून ओळखीने मान्यता आणणे हे यांचा बाएँ हात का खेल है. गडगंज संपत्ती यांनी कमवलेली असते पन तरूणांनो तुमचं काय? घरातले माणूस साध्या थंडीतापाने आजारी पडले तर तुमच्याकडे अँडमीट करायला पैसा नसतो. बर दवाखान्यासाठी किंवा इतर कामासाठी जरी तुम्हाला यांनी थोडीसी पैशाची मदत केली तर तुम्हाला तो खुप मोठा ऊपकार वाटतो म्हणून तिथेच तुम्ही रिकामटेकड्यासारखे चिटकून राहता? स्वतःच विश्व कष्ट करून स्वबळावर निर्माण करा तरच तुम्हाला लग्नासाठी मुलगी मिळेल.

अनेक तरूण मुलांचा राजकिय लोक दादागिरी भाईगिरीसाठी वापर करून घेताना दिसतात. त्यांनी शब्द फेकायचा आणि या मुलांनी तो झेलायचा. कुठे भांडण करायचे असतील कुठे एखाद्या प्राँपर्टीवरून प्लाँटवरून वाद असतील तर हिच मुले भांडण करायला पुढे असतात यातून मोठा गुन्हा घडला पोलिसकेस झाली तर या तरूणाईंचे जिवन बरबाद होते. कोर्टकचेरी मागे लागते तारखेवर तारखा पडतात कोर्टाचे हेलपाटे वकिलाची फि देणही शक्य नसते. मग नसता खटाटोप करायचाचं नाही आपण आपला परिवार आणि आपले करियर यावरचं लक्ष केंद्रित करा मुलांनो. नको त्या म्रुगजळात अडकूच नका.

असं जिवन जगणे हे जिवन नाही स्वामी विवेकानंदांनी तरूणांसाठी लिहलेले विचार आत्मसात करा. स्वत:च्या मनगटात ताकत निर्माण करून स्वबळावर स्वत:चे विश्व निर्माण करा. स्वत:चा अमूल्य वेळ अभ्यासासाठी खर्च करा नक्कीच तुमच्या आयुष्याचे तुमच्या घरादाराचे सोनं होईल. तात्पुरता झगमगाट हाँटेलिंग फुकटच्या चारचाकीत फिरणे सोडून द्या. या गोष्टी क्षणिक आनंद देनारया आहेत. यांच्यामागे धावण्यापेक्षा डोंगरावर धावा रस्त्याने धावा पोलिसमधे भरती व्हा देशरक्षणासाठी मिलिटरीमधे भरती व्हा. ते तुमचे जिवन नेहमीच शानमधे असेल. भारतमातेचा पुत्र म्हणून तुमच्याकडे कौतूकाने पाहिले जाईल. पहा पटतय का मनाला?

***जाता जाता तरूणाईसाठी काही शब्द***
***ऊठ तरूणा जागा हो***
***शिल्पकार तूच तुझ्या जिवनाचा....***
***अभ्यासाचे कष्ट घेऊन घडशील तू***
***चांगला नागरीक या देशाचा....***
***राजकारण्यांमागे नको तू***
***रिकामटेकड्यासारखं फिरूसं....***
***स्वत:चे जिवन नको***
***तू विणाकारण बरबाद करूसं....***
***धावायचचं आहे तुला तर***
***धाव तू डोंगरांगावरून....***
***देशरक्षणाची शपथ घे***
***दाखव तू मिलिट्रीत भरती होऊन....***
***जिवन असेल ईथे शानमधे***
***आणि शानमधे मरणही असेल....***
***तुझ्यापाठीमागेही तुझे देशासाठी***
***शहीद म्हणून नाव असेल....***

**शब्दांकन – सौ. आशा सुधीर साठे, सैनिक पत्नी**
**अहिल्यानगर, मो. ९६०४०५६९२८**

# ‘दुसरे बालपण स्पर्धा २०२६’ मध्ये ‘संगीत निकेतन’ यांचे ‘शुभमंगल’ यांनी प्रथम तर ‘ओम नाट्य संस्कार’च्या ‘तुला भेटतो रे’ या नाटिकेने पटकावले व्दितीय पारितोषिक

नगर – येथील डॉ. कांकरिया यांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित खास ज्येष्ठ नागरिकांसाठी दुसरे बालपण स्पर्धा २०२६ मध्ये नगर येथील संगीत निकेतन यांचे ‘शुभमंगल’ यांनी प्रथम तर ओम नाटय संस्कार ‘तुला भेटतो रे’ या नाटिकेने व्दितीय पारितोषिक पटकावले. तृतीय पारितोषिक सप्तरंग थिएटर्स यांचे ‘एक आगळा वेगळा सोहळा’ यांना प्राप्त झाले. आणि उत्तेजनार्थ पारितोषिक विभागुन देण्यात आले त्यात छत्रपती संभाजीनगर येथील स्वयंसिध्द ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संघ यांचा ‘लग्न सोहळा की गरज?’ आणि आमचे आम्ही या संस्थेचे सहव्वीस लग्नाची गोष्ट यांना मिळाला. खास दुसरेबालपण या स्पर्धेसाठी लिहिलेल्या जागतिक लग्नोत्सव या नाटिकेसाठी लेखनाचे पारितोषिक पुणे येथील लेखक चंद्रशेखर जोशी यांना प्राप्त झाले, अशी माहिती संयोजिका डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.


डॉ. कांकरिया यांचे मानकन्हैय्या ट्रस्ट आयोजित खास ज्येष्ठ नागरिकांसाठी दुसरे बालपण स्पर्धा २०२६ मध्ये नगर येथील संगीत निकेतन यांचे ‘शुभमंगल’ यांनी प्रथम तर ओम नाटय संस्कार ‘तुला भेटतो रे’ या नाटिकेने व्दितीय पारितोषिक पटकावले.

सदर प्रसंगी खास परिक्षकांच्या शिफारशीने ८० वर्षांच्या आशा देशपांडे व सौ. मिनाक्षी सरोदे यांचा उत्कृष्ट अभिनयासाठी विशेष सत्कार करण्यात आला. परीक्षक म्हणून सौ. स्नेहा रानडे, अमोल खोले, शैलेश देशमुख यांनी काम पाहिले. सदर स्पर्धेचा शुभारंभ परीक्षकांच्या हस्ते नटराज पुजन, प्रतिमा पुजन व दिपप्रज्वलनाने झाला. ४ वर्षीय छोटी रियांशी राठी हिने ३ मिनीटात हनुमान चालिसा सादर करून विश्वविक्रम केला त्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. जागतिक किर्तीचे चित्रकार शिल्पकार प्रमोद कांबळे यांच्या हस्ते ३ डी फोटो पॉईंटचे उद्घाटन झाले. दिवसभर शेकडो प्रेक्षकांनी या फोटो पॉईंटवर फोटो काढून हरवलेली संस्कार शाळा परत गवसण्याचा आनंद व्यक्त केला.

पारितोषिक वितरण समारंभ साहित्यकार, नाटककार सदानंद भणगे यांच्या हस्ते झाले. ते म्हणाले की खास ज्येष्ठ नागरिकांसाठी अशा प्रकारची आगळी वेगळी स्पर्धा ही भारतातीलच काय पण जगातील प्रथम व एकमेव अशी आहे. ही स्पर्धा ज्येष्ठांच्या जीवनात सप्तरंगी रंग भरणारी आहे. जगण्याला एक आगळावेगळा अर्थ प्राप्त करून देणारी आहे. दुसरे बालपण म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे तर कला व आनंद यांचा सुरेख संगम आहे. यातुन दुसऱ्या बालपणाला बागडण्यासाठी एक नवीन रंगमंच प्राप्त होतो. कलागुणांचे जागरण होते. अशा स्पर्धेमध्ये भाग घेणे म्हणजे जीवनाला एक टॉनीक मिळणे होय. मी डॉ. सुधा व डॉ. प्रकाश कांकरिया आणि संयोजन समितीचे अभिनंदन करतो.

सुरूवातीस कार्याध्यक्षा डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वागत केले. स्पर्धेमागचा उद्देश स्पष्ट केला. यंदाच्या वर्षी छत्रपती संभाजीनगर, तसेच येवला नाशिक, अहिल्यानगर सहित एकुण १२ संघांनी सहभाग नोंदवला याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. २०२७ च्या दुसऱ्या बालपण स्पर्धेची थीम जाहिर केली, थीम– मला मिळालेले पहिले पत्र. या थीमला अनुसरून नाटिका, नृत्यनाटिका, संगीत नाटिका सादर करण्याचे आवाहन केले.

डॉ. प्रकाश कांकरिया यांनी मातोश्री स्वातंत्र्य सैनिका मानकुंवरबाई कांकरिया, पिताश्री कन्हैय्यालाल कांकरिया यांच्या स्मरणार्थ मानकन्हैय्या ट्रस्टची स्थापना झाली असे सांगुन या ट्रस्टच्या माध्यमातुन राज्यस्तरीय बालएकांकिका स्पर्धा कांकरिया करंडक तसेच दुसरे बालपण स्पर्धेचे आयोजन होते हे नमुद केले. यंदाच्या वर्षी खास प्रेक्षकांनाही स्पर्धेच्या निकालाचा अंदाज लावण्यासाठी संधी देण्यात आली होती त्यात ३ प्रेक्षकांनी बरोबर अंदाज व्यक्त करून सन्मानपत्र पटकावले. ‘चाय पे चर्चा’ ही नाटिका सादर करून चंद्रशेखर जोशी आणि सौ. अजया जोशी प्रेक्षकांची वाह वा मिळविली.

सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पी. डी. कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, हेमंत लोहगांवकर, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दिपक शिरसुल हे परिश्रम घेतले. सूत्रसंचलन आदिनाथ अन्नदाते, डॉ. प्राजक्ता सावेडकर यांनी केले. प्रशांत कटके यांनी आभार मानले.

## गटविकास अधिकारीपदी सारिका निमसे-सस्ते यांची निवड



नगर – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत नगर तालुक्यातील मांडवे या गावातील शेतकरी कुटुंबातील कन्या सारिका संपत निमसे–सस्ते यांनी उल्लेखनीय यश संपादन करत गटविकास अधिकारी (वर्ग–१) पदावर निवड मिळवले आहे.

सारिका निमसे–सस्ते यांचे प्राथमिक शिक्षण मांडवे येथील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर त्यांनी गावातील काकासाहेब म्हस्के विद्यालयात माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. उच्च शिक्षणासाठी त्यांनी नगर येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाची निवड केली. घरची आर्थिक परिस्थिती साधी असतानाही त्यांनी शिक्षणाची जिद्द कायम ठेवत डी.एड. पूर्ण केले आणि शिक्षक म्हणून सेवेत रुजू झाल्या.

शिक्षक म्हणून कार्यरत असतानाच त्यांनी प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले. शाळेची जबाबदारी, कौटुंबिक कर्तव्ये आणि स्पर्धा परीक्षांचा अभ्यास यांचा उत्कृष्ट समतोल साधत त्यांनी सातत्याने एमपीएससीचा अभ्यास सुरू ठेवला. अनेक अडचणींवर मात करत त्यांनी २०२२ मध्ये शाळा निरीक्षक (सीडीपीओ) पदासाठी यश मिळवले. मात्र, तेथेच न थांबता अधिक मोठ्या ध्येयासाठी त्यांनी आपले प्रयत्न अविरत सुरू ठेवले.

२०२४ मध्ये महिला बालविकास अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतरही त्यांनी अभ्यासात खंड पडू दिला नाही. अखेर २०२६ मध्ये जाहीर झालेल्या निकालात गटविकास अधिकारी पदावर निवड होऊन त्यांनी आपल्या स्वप्नांना यशाची सुवर्णमुद्रा दिली.

त्यांच्या या यशामागे वडील संपतराव निमसे, आई लताबाई निमसे, पती अश्रूकांत सस्ते तसेच संपूर्ण कुटुंबीयांचे सहकार्य लाभले. पुणे येथील पुतणे संकेत निमसे यांचे मार्गदर्शन आणि बहिणी सावित्री निमसे यांचा प्रेरणादायी सहवासही त्यांच्या यशात महत्त्वाचा ठरला.

दरम्यान, शेख ईलाईबकस, सेवानिवृत्त मुख्याध्यापक किसन निमसे तसेच ह.भ.प. सतिष महाराज निमसे यांनी त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नाना डोंगरे व शिक्षिका सीमा गायकवाड यांना ‘महाराष्ट्र नायक’ राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर




नगर – बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था व सत कबीर बहुद्देशीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने नाना डोंगरे आणि उपक्रमशील शिक्षिका सीमा रामराव गायकवाड यांना महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. ३१ मे रोजी नाशिक रोड येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात त्यांना गौरविण्यात येणार असल्याची माहिती मुख्य आयोजक भूषण सरदार यांनी दिली.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून कार्यरत असलेले पै. नाना डोंगरे यांनी नगर तालुक्यासह जिल्हाभर विविध सामाजिक उपक्रमांद्वारे आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागात सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात त्यांनी सातत्यपूर्ण व प्रभावी कार्य उभारले आहे. संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील जनतेमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी अनेक विधायक उपक्रम राबविण्यात आले आहेत. पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिमा, स्त्री जन्माचे स्वागत, स्वच्छता अभियान, महिला सक्षमीकरण, मतदार जनजागृती, जलसंधारण जनजागृती, रक्तदान शिबिरे अशा विविध सामाजिक उपक्रमांद्वारे त्यांनी समाजामध्ये सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न केला आहे. युवकांमध्ये व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचविण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. तसेच गावपातळीवर आरोग्य शिबिरांचे आयोजन करून ग्रामीण नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचे कार्यही सातत्याने सुरू आहे. महिला बचत गट मेळावे, युवा संमेलने, विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनातून ग्रामीण समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य त्यांनी केले आहे. साहित्य क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. ग्रामीण भागातील नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी आठ राज्यस्तरीय काव्य संमेलने तसेच चार ग्रामीण मराठी साहित्य संमेलने यशस्वीपणे आयोजित केली आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

दरम्यान, सीमा रामराव गायकवाड या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामणी, ता. मानोरा (जि. वाशिम) येथे शिक्षिका म्हणून कार्यरत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी त्या सातत्याने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. विद्यार्थ्यांना आधुनिक व डिजिटल पद्धतीने शिक्षण मिळावे यासाठी त्या विशेष प्रयत्नशील आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत यश संपादन केले असून विविध शैक्षणिक उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. उपक्रमशील शिक्षिका म्हणून त्यांनी शिक्षण क्षेत्रात स्वतंत्र ओळख निर्माण केली असून सामाजिक कार्यातही त्यांचे योगदान सुरु आहे. शिक्षण आणि समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांनाही महाराष्ट्र नायक राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

## अहिल्यानगर शहरात २९ ते ३१ मे दरम्यान तीन दिवसीय ‘निवासी लघुपट कार्यशाळा’

नगर – डी एल फिल्म प्रॉडक्शन्स हाऊस आणि समाज परिवर्तन संस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय निवासी व अनिवासी लघुपट कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २९ ते ३१ मे दरम्यान बॉस्को ग्रामीण विकास केंद्र, केडगाव येथे सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणार आहे. कार्यशाळेत लघुपट निर्मिती तंत्रज्ञान, लघुपट स्क्रिप्ट लेखन, व्हिडिओग्राफी तंत्रज्ञान, अभिनय तंत्रज्ञान तसेच फिल्म एडिटिंग तंत्रज्ञान याबाबत तज्ज्ञांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

कार्यशाळा निवासी व अनिवासी स्वरूपात आयोजित करण्यात आली असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर केवळ १० जागांसाठी प्रवेश दिला जाणार आहे. २५ मे पूर्वी नोंदणी करावी.

माहितीसाठी व नोंदणीसाठी ९४२२०१७९५० / ९८२२२८४८५४ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच shirish22jadhav@gmail.com या ई–मेलवरही संपर्क करता येणार आहे.



### जैन वात्सल्य संस्थेच्यावतीने गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट

श्री जैन ओसवाल वात्सल्य संस्थेच्या वतीने दर महिन्याला समाजातील गरजू कुटुंबांना महिनाभराचा किराणा भेट देण्यात येतो. या महिन्यात धार्मिक परीक्षा बोर्ड समोरील सचिन अशोक कोठारी यांच्या बंगल्यावर गरजूंना अन्नधान्य व किराणा वाटप करण्यात आले. यावेळी कांतीलाल फिरोदिया, मनोरमा फिरोदिया, अरूणा मुथा, इंद्रलाल मुथा, भारती मुथा, विजय मुथा, ज्योती मुथा, वर्धमान मुथा, अश्विनी मुथा, पियुष मुथा, निशा मुथा, दीपेश, अंशु, कविशा मुथा, संस्थेचे सेक्रेटरी विजय गुगळे आदी उपस्थित होते.

# गृहउद्योजिका मीरा बेरड यांना ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान

नगर – परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने शहरातील गृहउद्योजिका मीरा बाळासाहेब बेरड यांना खारघर, नवी मुंबई येथे ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान करण्यात आला. महिला उद्योजकतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या मीरा बेरड यांच्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.


परिणीता सोशल फाऊंडेशनच्या वतीने शहरातील गृहउद्योजिका मीरा बाळासाहेब बेरड यांना खारघर, नवी मुंबई येथे ‘परिणीता सन्मान २०२६’ प्रदान करण्यात आला.

लिटिल वर्ल्ड मॉल, खारघर (नवी मुंबई) येथील बॅन्क्वेट हॉलमध्ये झाले. यावेळी चित्रपट निर्मात्या अमृता राव, मानसी इंगळे, मधुराज बिल्डर्सचे मधु पाटील, ईपीआरच्या संचालिका अपर्णा शाह यांच्यासह अनेक व्यक्तींनी उपस्थित राहून महिला उद्योजिकांचा गौरव केला.

नगर तालुक्यातील दरेवाडी गावच्या रहिवासी असलेल्या मीरा बेरड यांनी स्वामी समर्थ स्वयंसहाय्यता समूहाच्या माध्यमातून स्वतःचा ‘अमृत फूड प्रोडक्ट्स’ हा गृहोद्योग सुरू केला. अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून सुरू झालेला हा व्यवसाय आज यशस्वी उद्योगात परिवर्तित झाला आहे. गेल्या पाच वर्षांपासून त्या विविध खाद्यपदार्थांचे उत्पादन करून बाजारपेठेत स्वतःचा वेगळा ठसा उमटवत आहेत.

मीरा बेरड यांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग व्यवसाय उभे केले आहे. या उद्योगामुळे अनेक महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. केवळ रोजगारच नव्हे, तर महिलांना स्वावलंबी बनण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन आणि प्रशिक्षण देण्याचे कामही त्या सातत्याने करत आहेत. त्यांच्या प्रेरणेतून अनेक महिलांनी लघुउद्योग क्षेत्रात पाऊल टाकले असून आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मार्ग स्वीकारला आहे.

कोरोना काळात अनेक महिलांचे उद्योग अडचणीत आले होते. अशा उद्योजिकांना प्रोत्साहन आणि सहाय्य मिळावे या उद्देशाने परिणीता सोशल फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातील २२ जिल्ह्यांमध्ये या संस्थेच्या सदस्या कार्यरत असून महिला उद्योजिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांचा सन्मान करणे आणि त्यांना व्यवसायासाठी प्रोत्साहित करणे, असे महत्त्वपूर्ण कार्य संस्था करत आहे.

# अवघ्या ३२ दिवसांत कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण केल्याने मुफ्ती मोहम्मद शाकिर खान यांना फखर-ए-हिंद पुरस्कार

नगर – ऑल इंडिया उलमा बोर्ड तर्फे मुंबई येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात मुफ्ती मोहम्मद शाकिर मतीउल्लाह खान यांना फखर–ए–हिंद पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातील येरवडा सेंट्रल जेल येथे अवघ्या ३२ दिवसांत संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर लिहून त्यांनी ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या या उल्लेखनीय कुरआनी सेवेला गौरव देण्यासाठी हा विशेष सन्मान देण्यात आला.



ऑल इंडिया उलमा बोर्डतर्फे मुंबई येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात मुफ्ती मोहम्मद शाकिर मतीउल्लाह खान यांना फखर–ए–हिंद पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सुमारे १३ वर्षांपूर्वी मुफ्ती यांच्यावर काही निराधार आरोप करण्यात आले होते. त्या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान त्यांना येरवडा कारागृहात ठेवण्यात आले होते. मात्र, नंतर न्यायालयाने सर्व पुरावे आणि तथ्यांचा सखोल अभ्यास करून त्यांना निर्दोष मुक्त केले. सर्व आरोप खोटे आणि बनावट असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर मुफ्ती यांनी कठीण परिस्थितीतही संयम, धैर्य आणि चिकाटीचे उदाहरण घालून दिले. तुरुंगातील कालावधीत त्यांनी संपूर्ण कुरआन शरीफचे भाषांतर पूर्ण करून प्रेरणादायी इतिहास रचला.

हा पुरस्कार आमदार जिशान बाबा सिद्दिकी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी माजी आमदार अतुल शाह, मुश्ताक नाखवा, माजी आमदार अण्णा, एनसीपी नेते मोईन कश्मीरी, सुहैल सुभेदार, नबील उझअमा, हाजी शहनवाज, राविश मोमीन, हाफिज यमीन बासर, अझहर शेख उपस्थित होते.

या सोहळ्यास विद्यार्थी, पालक उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुफ्ती मोहम्मद शाकिर खान यांनी ऑल इंडिया उलमा बोर्ड चे नॅशनल जनरल सेक्रेटरी अंजर अनवर खान, मुंबई अध्यक्ष आरिफ बापू मेमन आणि संपूर्ण उलमा बोर्ड टीमचे आभार मानले. याचवेळी त्यांच्या तुफ्हा–ए–जिंदाँ या पुस्तकाची प्रत लवकरच बाजारात उपलब्ध होणार असल्याची घोषणा करण्यात आली. त्यामुळे अधिकाधिक वाचकांना आणि अभ्यासकांना या पुस्तकाचा लाभ घेता येणार आहे.

# ‘जिद्द पेरतांना’ कादंबरीला राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार


राजेश चौरे

नगर – शिवबाबा वाघ प्रतिष्ठान (पिंपळगाव जलाल, ता. येवला, जि.नाशिक) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ’शहादू शिवाजी वाघ स्मृती राज्यस्तरीय पाचव्या साहित्य कलाकृती पुरस्कारा’ची घोषणा करण्यात आली आहे. यावर्षीचा राज्यस्तरीय प्रथम क्रमांकाचा पुरस्कार चांदा (जि.अहिल्यानगर) येथील लेखक राजेश चांगदेव चौरे यांच्या ’’जिद्द पेरतांना’’या कादंबरीला जाहीर झाला आहे.

शिवबाबा वाघ प्रतिष्ठानच्या वतीने १ मे रोजी या पुरस्कारांची अधिकृत घोषणा करण्यात आली. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालखंडात प्रकाशित झालेल्या एकूण २२ उत्कृष्ट कादंबऱ्या प्रतिष्ठानकडे प्राप्त झाल्या होत्या. या सर्व कादंबऱ्यांमधून परीक्षकांनी सखोल मूल्यमापन करून लेखक राजेश चौरे यांच्या ’जिद्द पेरतांना’ या कलाकृतीची प्रथम क्रमांकाच्या पुरस्कारासाठी एकमताने निवड केली.

कादंबरीचे परीक्षण प्रा.डॉ. आर आर जे इंगोले चांदवड (नाशिक) यांनी केले होते. तसेच या कादंबरीला भारत सन्मान २०२६ व अक्षर सागर साहित्य मंच गारगोटीचा राज्यस्तरीय उत्कृष्ट कादंबरी पुरस्काराने देखील गौरवण्यात आले आहे.

# रक्तदान हेच जीवनदान : मदत सोशल फाऊंडेशनचा जनजागृती उपक्रम

### एक रक्तदाता अनेकांचे जीवन वाचविणारा देवदूत : ॲड. मोनाश्री अहिरे

नगर – जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथील हिमोटॉलॉजी विभागामध्ये रक्तदान शिबिर विषयक जनजागृती तसेच जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या रक्तटंचाईवर उपाययोजना यासंदर्भात मदत सोशल फाउंडेशनच्या वतीने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मदत सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा ॲड. मोनाश्री अहिरे यांनी जिल्ह्यातील नागरिकांना नियमित रक्तदान करण्याचे जाहीर आवाहन केले. रक्तदान हे समाजाप्रती असलेले सर्वात मोठे कर्तव्य असून एका रक्तदात्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे त्यांनी सांगितले.


जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या रक्तटंचाईवर उपाययोजनांसंदर्भात मदत सोशल फाउंडेशनच्यावतीने विशेष मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान जिल्हा रुग्णालयातील समन्वयक डॉ. आशिष इरमल यांनी थॅलेसेमिया, सिकल सेल आणि हिमोफिलिया यांसारख्या गंभीर आजारांमध्ये रुग्णांना वारंवार रक्ताची आवश्यकता भासत असल्याची माहिती दिली. अनेक रुग्णांचे जीवन हे नियमित रक्तपुरवठ्यावर अवलंबून असल्याने समाजातील प्रत्येक नागरिकाने रक्तदानासाठी पुढे येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.


या उपक्रमाची विशेष बाब म्हणजे ॲड.मोनाश्री अहिरे यांनी स्वतः रक्तदान करून जनजागृती मोहिमेची सुरुवात केली. यामुळे उपस्थित नागरिकांमध्ये रक्तदानाविषयी सकारात्मक संदेश पोहोचला.

कार्यक्रमास ॲड.तहसीन शेख, श्रीधर शेलार यांच्यासह मदत सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**समाजासाठी महत्त्वाचे संदेश :** रक्तदानामुळे कोणताही शारीरिक त्रास होत नाही., नियमित रक्तदान केल्याने अनेक रुग्णांना जीवनदान मिळू शकते. थॅलेसेमिया व हिमोफिलिया रुग्णांसाठी रक्ताची सतत गरज असते., युवकांनी वाढदिवस, सामाजिक कार्यक्रम यानिमित्त रक्तदानाचा संकल्प करावा., जिल्ह्यात रक्तटंचाई टाळण्यासाठी स्वयंसेवी संस्था व नागरिकांनी एकत्र येणे आवश्यक आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता



## आतापर्यंतचा सर्वात मोठा आवाज...

लाईव्ह कॉन्सर्ट्स, फटाके आणि स्टेडियममधील गर्दीचे आवाज धोकादायक पातळीपर्यंत वाढू शकतात. इतके मोठे की कायमस्वरूपी श्रवणशक्ती कमी होऊ शकते. पण, पृथ्वीवर आतापर्यंत नोंदवलेला सर्वात मोठा आवाज कोणता? याचे उत्तर तुम्ही 'आवाज' या शब्दाचा कसा अर्थ लावता आणि तुम्ही जुन्या ऐतिहासिक नोंदींचा समावेश करता की, केवळ आधुनिक वैज्ञानिक उपकरणांनी केलेल्या मोजमापांवर विश्वास ठेवता, यावर अवलंबून आहे. इंडोनेशियातील ज्वालामुखी बेट असलेल्या क्राकाटाऊचा १८८३ चा उद्रेक हा अनेकदा इतिहासातील सर्वात मोठा आवाज मानला जातो. हा स्फोट लोक १,९०० मैल (३,००० किलोमीटर) पेक्षा जास्त अंतरावर ऐकू शकले होते आणि जगभरातील बॅरोमीटर्सने त्याची दाब लहर (pressure wave) नोंदवली.


स्फोटाच्या जागेपासून १०० मैल (१६० किमी) अंतरावर, आवाजाची पातळी अंदाजे १७० डेसिबल इतकी होती, जी कायमस्वरूपी श्रवणशक्तीच्या नुकसानीसाठी पुरेशी आहे. खलाशांनी नोंदवल्यानुसार, ४० मैल (६४ किमी) अंतरावर, आवाज इतका तीव होता की, त्याने कानाचे पडदे फाटू शकले. आधुनिक अंदाजानुसार, क्राकाटाऊच्या स्फोटाने सुमारे ३१० डेसिबलपर्यंत आवाज गाठला असावा. या पातळीवर, ध्वनी लहरी सामान्य आवाजाप्रमाणे (जो कणांना कंपित करतो आणि कंप्रेशन व विरलन (rarefaction) चे क्षेत्र निर्माण करतो) वागत नाहीत. त्याऐवजी, सुमारे १९४ डेसिबल च्या आसपास, त्या शॉक वेव्हजमध्ये रूपांतरित होतात, जेव्हा एखादी वस्तू आवाजाच्या वेगापेक्षा वेगाने प्रवास करते, तेव्हा तयार होणारी शक्तिशाली दाब आघाडी.

क्राकाटाऊची शॉक वेव्ह इतकी तीव होती की, तिने पृथ्वीला सात वेळा प्रदक्षिणा घातली. जर्मनीतील आरडब्ल्यूटीएच आचेन युनिव्हर्सिटीमध्ये श्रवण तंत्रज्ञान आणि ध्वनिकी संस्थेचे प्रमुख आणि अमेरिकेच्या ध्वनिकी सोसायटीचे अध्यक्ष, मायकेल व्होरलँडर यांनी सांगितले की, क्राकाटाऊचा उद्रेक त्याच्या मूळ स्थानी किती मोठा होता हे आपल्याला खऱ्या अर्थाने माहीत नाही. कारण, तो मोजण्यासाठी कोणीही जवळ नव्हते. 'ध्वनी प्रसारणाबद्दल गृहितके केली जाऊ शकतात; परंतु ती अत्यंत अनिश्चित आहेत.' सर्वात मोठ्या आवाजासाठी आणखी एक दावेदार म्हणजे १९०८ चा सैबेरियातील तुंगुस्का उल्का स्फोट, ज्याने शेकडो चौरस मैलांवरील झाडे सपाट केली आणि जगभर दाब लहरी पाठवल्या. तुंगुस्का स्फोटाचा आवाज क्राकाटाऊच्या स्फोटाएवढाच, सुमारे ३०० ते ३१५ डेसिबल होता. परंतु, क्राकाटाऊच्या उद्रेकाप्रमाणेच, तुंगुस्काचा स्फोट देखील फक्त खूप दूर असलेल्या उपकरणांद्वारेच नोंदवला गेला.

## आण्विक तेजाने आकाशात प्रकाशकल्लोळ

खगोलशास्त्रज्ञांना बराच काळ गोंधळात टाकणारी एक अनोखी, तेजस्वी तारा प्रणाली लवकरच हजारो सूर्यांच्या अण्विक तेजाने आकाश प्रकाशित करू शकते, असे नवीन संशोधन सूचित करते. जेव्हा हे घडेल, तेव्हा त्याचे परिणाम पृथ्वीवरून दिवसा किंवा रात्री, नुसत्या डोळ्यांनीही दिसू शकतात.

'व्ही सॅजिटी' नावाची ही तारा प्रणाली धनु (Sagitta) या तारकासमूहात सुमारे १०,००० प्रकाश-वर्ष दूर स्थित आहे. या प्रणालीत एक पांढरा बटू तारा, जो मृत, सूर्यासारख्या ताऱ्याचा घन गाभा असतो आणि त्यापेक्षा अधिक वस्तुमान असलेला त्याचा एक साथीदार तारा यांचा समावेश आहे. यातील हा भुकेलेला पांढरा बटू त्याच्या साथीदार ताऱ्याकडून 'आजवर कधीही न पाहिलेल्या वेगाने' पदार्थ गिळंकृत करत आहे, असे टीमने एका निवेदनात सांगितले.



या दोन ताऱ्यांमध्ये इतके घट्ट कक्षीय नृत्य सुरू आहे की, ते फक्त १२.३ तासांत एकमेकांभोवती प्रदक्षिणा पूर्ण करतात आणि प्रत्येक प्रदक्षिणेसोबत ते हळूहळू एकमेकांच्या जवळ येत आहेत. संशोधकांनी आता पुष्टी केली आहे की, हे विनाशकारी नृत्य शेवटी दोन्ही तारे एकमेकांवर आदळण्याने समाप्त होईल आणि त्यातून एक इतका तेजस्वी नोव्हा स्फोट तयार होईल की, तो दिवसाही पृथ्वीवर दिसेल.

स्पेनमधील कॅनरी बेटे खगोल भौतिकी संस्थेचे प्राध्यापक आणि या अभ्यासाचे सहलेखक पाब्लो रॉड्रिग्ज-गिल यांनी एका निवेदनात म्हटले आहे, 'पांढऱ्या बटूवर जमा होणारे पदार्थ पुढील काही वर्षांत नोव्हा स्फोट घडवण्याची शक्यता आहे, ज्यामुळे 'व्ही सॅजिटी' नुसत्या डोळ्यांनी दिसू शकेल.' नोव्हेंबरमध्ये मंथली नोटिसेस ऑफ द रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटी या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासात, फिनलँडमधील तुर्कू विद्यापीठाच्या नेतृत्वाखालील एका आंतरराष्ट्रीय संशोधन पथकाने 'व्ही सॅजिटी' मधून उत्सर्जित होणाऱ्या प्रकाशाचे विश्लेषण केले, जेणेकरून तो नेमका कोणत्या प्रकारचा तारा आहे हे अधिक चांगल्या प्रकारे समजू शकेल.

## खांद्यावरचा टॅटू: सर्जरीनंतर आला जीभेवर!

ब्रिटनमध्ये राहणारी आणि अभिनयाचे शिक्षण घेत असलेली २१ वर्षीय विद्यार्थिनी हॅरियट ट्रेविट हिची कहाणी ऐकून तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. कर्करोगाच्या उपचारासाठी झालेल्या एका गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेनंतर, तिच्या खांद्यावरील टॅटू चक्क तिच्या जिभेवर आला आहे! हा केवळ एक वैद्यकीय चमत्कार नसून, हॅरियटच्या हिमतीचे एक मोठे उदाहरण मानले जात आहे.



उत्तर यॉर्कशायर येथील रहिवासी असलेल्या हॅरियटला या वर्षाच्या सुरुवातीला जिभेवर वेदनादायक फोड आला होता. सुरुवातीला तिला वाटले की, हा अपस्माराच्या दौऱ्यादरम्यान जिभेला झालेल्या दुखापतीमुळे झाला असेल. मात्र, जेव्हा बायोप्सी झाली, तेव्हा तिला मोठा धक्का बसला. स्क्वॅमस सेल कार्सिनोमासारखे गंभीर कर्करोग सामान्यतः वृद्धांमध्ये अधिक आढळतात. त्यामुळे २१ वर्षांच्या हॅरियटसाठी हे निदान मोठा धक्का देणारे होते. बायोप्सीनंतर एक महिन्याने तिला स्टेज टू स्क्वॅमस सेल कार्सिनोमा झाल्याचे निदान झाले आणि तातडीने उपचारांची तयारी सुरू झाली. हॅरियटची शस्त्रक्रिया अतिशय कठीण होती, ज्यात ॲडव्हान्स फ्री फ्लॅप टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात आला.

कर्करोगामुळे जिभेचा जो भाग काढावा लागला, तो पुन्हा तयार करणे हा या शस्त्रक्रियेचा उद्देश होता. हॅरियटने शस्त्रक्रियेबद्दल सांगितले, 'डॉक्टरांनी माझी अर्धी जीभ काढली. त्यानंतर, त्यांनी माझ्या खांद्यावरील त्वचा आणि रक्तवाहिन्या घेऊन माझी जीभ पुन्हा तयार केली.' याच सर्जरीमध्ये तिच्या खांद्यावर टॅटू असलेली त्वचादेखील जिभेवर हस्तांतरित झाली. जिभेवर आलेला टॅटू पाहून हॅरियटला धक्का बसला; पण तिला हसूदेखील आले. ती म्हणाली, 'हे सर्व इतके अविश्वसनीय होते की, हा वेडेपणा पाहून मला हसू आवरले नाही.' तथापि, ज्या ठिकाणाहून त्वचा काढली गेली, तो हाताचा भाग पाहून ती दुःखी झाली होती. तिच्यासाठी तो क्षण आनंद आणि वेदना यांचा मिलाफ होता.

## थंडीमध्ये चाकवत खावे का?

चाकवत भाजी हिवाळ्यात भरपूर प्रमाणात बाजारात येत असते. चाकवत भाजीचा आहारात समावेश अनेक वर्षांपासून केला जात आहे. थंडीत खास करून ही भाजी आवर्जुन केली जाते. ही भाजी चवीला तर चांगली असतेच शिवाय शरीरालाही मजबूत बनवते. या भाजीला नैसर्गिकपणे शरीर डिटॉक्स करणारी भाजी म्हटले जाते. चाकवत भाजीला चंदनबटवा आणि हिंदीत बथुआ म्हणतात. चाकवतची भाजी आपल्याकडे बहुतांशी शेंगदाणे किंवा वाटाणे घालून केलेल्या गरगट्याच्या स्वरूपात खाल्ली जाते. काही लोक चाकवत भाजीचा पराठाही करतात. चाकवत भाजीत विटामीन ए, सी, आयर्न आणि कॅल्शियम भरपूर असते.



चाकवत भाजीत मोठ्या प्रमाणात फायबर असते. त्यामुळे पोट फुगणे आणि बद्धकोष्ठता यासाठी ही भाजी गुणकारी आहे. पचन यंत्रणा जर चांगली राखायची असेल, तर चाकवत खाणे चांगले आहे. ही भाजी पचनसंस्था दुरुस्त करते. त्यामुळे बद्धकोष्ठता दूर होते. ज्या लोकांना गॅस, ॲसिडीटी आणि पोट फुगणे अशा तक्रारी असतील त्यांच्यासाठी ही भाजी औषधापेक्षा कमी नाही.

चाकवत रक्तदेखील शुद्ध करते, त्वचेला चमकदार बनवते. शरीरातील विषारी घटक बाहेर काढते. संधीवात, गुडघे दुखी, उच्च रक्तदाबाच्या समस्या दूर ठेवण्यासाठीही चाकवत भाजी फायदेशीर ठरते. थंडीत रोजच्या आहारात या भाजीचा समावेश केला, तर रोगप्रतिकारक शक्ती वाढेल. तसेच, शरीरात उष्णताही वाढेल. मात्र, चाकवत खाताना काही पथ्येही पाळावी लागतात. चाकवत भाजी ही उष्ण गुणधर्माची आहे. त्यामुळे ज्यांना किडनी स्टोनचा त्रास आहे, त्यांनी ही भाजी मर्यादित प्रमाणात खावी.

## पुतीनच्या 'एका' हाताचे गुढ

"Why Vladimir Putin Does Not Move His Right Hand' हा गुगलवर वारंवार सर्च होणारा प्रश्न आहे. यावरूनच रशियन राष्ट्राध्यक्षांची चाल किती चर्चेत आहे, याचा अंदाज बांधता येईल. मात्र खरोखरच पुतीन असं एक हात न हलवता का चालतात, माहितीये का? यामागील खरं कारण जाणून घेऊयात...

व्लादिमीर पुतीन चालताना त्यांचा उजवा हात हलवत नाहीत. त्यांचा चालताना कोणताही व्हिडीओ पाहिला, तरी त्यांच्या देहबोलीमधील हा उजवा हात न हलवण्याचा वेगळेपणा लगेच नजरेत भरतो. मात्र ते असं का करतात माहितीये का? खरं तर ज्या पद्धतीने पुतिन चालतात, ती एक विशिष्ट प्रकारची चालण्याची शैली आहे. या शैलीला 'गन्सलिंगर गेट' असं म्हणतात. आता पुतिन अशा पद्धतीने का चालतात, याबद्दलच्या कारणासंदर्भात बोलायचं झालं, तर यामागील मुख्य कारण केजीबी ही संस्था आहे. केजीबी ही रशियाची गुप्तचर संघटना आहे. पुतीन यांनी राजकारणात सक्रिय होण्यापूर्वी केजीबीमध्ये काम केलं आहे. ते गुप्तचर यंत्रणेसाठी काम करायचे. त्यावेळी त्यांना संस्थेत दाखल करून घेताना केजीबी प्रशिक्षण देण्यात आलं होतं.

केजीबीच्या प्रशिक्षणात एजंटांना शस्त्र काढण्यासाठी उजवा हात नेहमी तयार ठेवण्याचं प्रशिक्षण दिलं जातं. ज्यामुळे चालताना तो हात स्थिर राहतो आणि डावा हात सामान्यपणे हलतो. अनेकदा केजीबीच्या परेडमध्ये उजव्या हातात सरळ



खांद्यापर्यंत उभी बंदूक धरलेली असते. म्हणून तो हात स्थिर ठेवून डावा हात चालवत परेड केली जाते. यातूनच पुतीन यांची ही स्टाईल तयार झाल्याचं सांगितलं जातं. २०१५ मध्ये 'ब्रिटिश मेडिकल जर्नल'मध्ये (बीएमजे) प्रकाशित झालेल्या अभ्यासात पुतिनसह दिमित्री मेदवेदेव, अनातोली सेरद्युकोव यासारख्या इतर रशियन अधिकार्‍यांच्या चालण्याच्या शैलीचे विश्लेषण करण्यात आले.

यूट्यूब व्हिडीओ आणि केजीबीच्या प्रशिक्षण मॅन्युअलचा अभ्यास करून संशोधकांनी निष्कर्ष काढला की, पुतिन यांचं हे असं उजवा हात सरळ ठेवून चालणं म्हणजे एक शिकणीमधून आत्मसात केलेलं वर्तन आहे. संशोधकांनी याचा थेट संबंध सैन्य किंवा गुप्तचर प्रशिक्षणाशी जोडला आहे. केजीबी मॅन्युअलमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, चालताना उजवा हात छातीजवळ ठेवावा, जेणेकरून गरज पडल्यास त्वरित शस्त्र काढता येईल.

यामधूनच पुतीन यांची ही चालण्याची शैली निर्माण झाल्याचं सांगितलं जातं. अभ्यासात असे दिसून आले की, पुतिन यांच्या अशा वेगळ्या चालीचा इतर न्यूरोलॉजिकल समस्यांशी काहीच संबंध नाही. पार्किन्सन्स रोगातील कंप किंवा स्थिरतेचा या चालीशी काही संबंध असल्याचं दिसत नाही. पुतीन जूडो, पोहणे यासारख्या गोष्टी सहज करतात. यामधूनच त्यांना कोणतीही वैद्यकीय समस्या नसल्याचं सूचित करते. काही तज्ज्ञांनी पुतीन यांच्या या चालीचा पार्किन्सन्स किंवा खांद्याच्या दुखापतीशी संबंध जोडला आहे. पण अभ्यासात हे कारण नाकारण्यात आले आहे. हे कारण फेटाळून लावण्याचं मुख्य तर्क म्हणजे पुतीन यांचं हे असं चालणं वर्षानुवर्षे स्थिर आहे आणि त्याचा कोणत्याही व्याधीशी संबंध जोडता येणार नाही.



## 'हॉबिट' मानव प्रजाती कशामुळे नष्ट झाली?

*होमो फ्लोरेसिएन्सिस या लहान आकाराच्या प्राचीन मानव प्रजातीला 'हॉबिट' असे टोपणनाव देण्यात आले आहे. ती सुमारे ५०,००० वर्षांपूर्वी नामशेष झाली असावी. नवीन संशोधनानुसार, कमी झालेल्या पर्जन्यमानामुळे शिकारीसाठी उपलब्ध भक्ष्यांची संख्या कमी झाली असावी, ज्यामुळे त्यांना अशा भागात स्थलांतर करण्यास भाग पाडले गेले, जिथे त्यांची आधुनिक मानवांशी स्पर्धा झाली. संशोधक चमूने नमूद केले की, पाऊस कमी होणे हे त्यांच्या नामशेष होण्याचे एकमेव कारण नसावे. सुमारे ५०,००० वर्षांपूर्वी झालेला ज्वालामुखीचा उद्रेक देखील त्यांच्या विनाशात एक महत्त्वपूर्ण घटक ठरला असावा.*

आतापर्यंत हॉबिटचे जीवाश्म इंडोनेशियातील फ्लोरेस बेटावरील लियांग बुआ नावाच्या एकाच गुहेत सापडले आहेत. २००४ मध्ये H. floresiensis च्या शोधाची माहिती सार्वजनिक झाल्यापासून, शास्त्रज्ञ ही लहान प्रजाती कशी जगली आणि ती का नामशेष झाली, हे शोधण्याचा प्रयत्न करत आहेत. सोमवारी (८ डिसेंबर) कम्युनिकेशन्स अर्थ ॲंड एन्व्हायरन्मेंट जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका शोधनिबंधात, शास्त्रज्ञांनी सांगितले की, ५०,००० वर्षांपूर्वी या बेटावर पर्जन्यमान लक्षणीयरीत्या कमी झाले होते. हॉबिट ज्याची शिकार करत असत, त्या स्टेगोडॉन (हत्तीच्या नामशेष झालेल्या प्रजातीचा एक वंश) या प्राण्याची संख्या देखील ५०,००० वर्षांपूर्वी फ्लोरेस बेटावरून नाहीशी होण्यापूर्वी कमी झाली होती.

बेटावरील पर्जन्यमान कसे बदलले हे निश्चित करण्यासाठी, चमूने लियांग बुआ जवळ असलेल्या लियांग लुआन नावाच्या गुहेतील एका स्टॅलगमाइटचा अभ्यास केला. स्टॅलगमाइट तेव्हा वाढतात जेव्हा पाण्याची वाफ होते आणि कॅल्शियम कार्बोनेट तयार होते. नवीन वाढीमध्ये मॅग्नेशियमसारख्या इतर खनिजांचेही अल्प प्रमाण असते. संशोधकांनी त्यांच्या शोधनिबंधात नमूद केले की, पाण्याची कमतरता असताना स्टॅलगमा वेगाने वाढत नाहीत आणि जी वाढ होते त्यात कॅल्शियम कार्बोनेट कमी आणि मॅग्नेशियम जास्त असते.

याचा अर्थ, मॅग्नेशियम आणि कॅल्शियम कार्बोनेटचे प्रमाण मोजून, चमूने पाऊस कधी कमी किंवा वाढला आणि किती प्रमाणात, हे निश्चित केले. संशोधकांना आढळले की, ७६,००० वर्षांपूर्वी वार्षिक सरासरी पर्जन्यमान ६१.४ इंच (१,५६० मिलिमीटर) होते, ते ६१,००० वर्षांपूर्वी कमी होऊन ४० इंच (९९० मिमी) झाले. या बेटावर ५०,००० वर्षांपर्यंत कमी झालेला पाऊस कायम राहिला. त्यानंतर, जवळच्या एका ज्वालामुखीचा उद्रेक झाला आणि बाहेर पडलेल्या खडकाचा एक थर बेटावर पसरला.

## असा नामशेष झाला 'स्टेलर्स सी काऊ'

आर्क्टिक प्रदेशातील थंड पाण्यामध्ये आढळणारा आणि 'स्टेलर्स सी काऊ' म्हणून ओळखला जाणारा हा तब्बल ३० फूट लांबीचा सागरी प्राणी त्याच्या चविष्ट मांस आणि जाड चरबीच्या थरामुळे मानवाद्वारे इतक्या वेगाने मारला गेला की, तो अवघ्या काही वर्षांत पृथ्वीवरून कायमचा नामशेष झाला. या शांत आणि महाकाय जीवाचे काही मोजकेच सांगाडे आजही शिल्लक आहेत.

या अवाढव्य सागरी प्राण्याचा शोध १७४१ मध्ये लागला. नैसर्गिक शास्त्रज्ञ जॉर्ज विल्हेम स्टेलर हे व्हिटस बेरिंग यांच्या नेतृत्वाखाली सायबेरियातून अमेरिकेकडे सागरी मार्ग शोधण्याच्या मोहिमेवर होते. अलास्काच्या किनाऱ्यायाहून परतत असताना त्यांचे जहाज बेरिंग बेटावर कोसळले. नोव्हेंबर १७४१ रोजी, स्टेलर जेव्हा सरपण शोधत किनाऱ्यायावरून चालत होते, तेव्हा त्यांना समुद्रात काही गडद आकृत्या तरंगताना दिसल्या. सुरुवातीला त्यांना ते लाकडी ओंडके वाटले; पण श्वासोच्छ्वास आणि फुत्कार ऐकून त्यांना समजले की, तो अज्ञात सागरी जीवांचा एक मोठा कळप होता. स्टेलर यांनी या प्राण्याला वैज्ञानिकदृष्ट्या नोंदवले, ज्यामुळे त्याला त्यांच्याच नावावरून 'स्टेलर्स सी काऊ' असे नाव मिळाले. हा प्राणी मॅनटी आणि डुगोंग या सागरी जीवांच्या प्रजातीशी संबंधित होता.



**हिमयुगातील महाकाय जीव**

हा प्राणी खऱ्याया अर्थाने एक महाकाय होता. पूर्ण वाढलेला सी काऊ सुमारे ३० फूट लांबीचा आणि १०,००० किलो वजनाचा असायचा. सिरेनियन गटातील बहुतेक प्राणी उबदार समुद्रात राहतात. परंतु, स्टेलर्स सी काऊने उत्तरेकडील थंड पाण्याशी जुळवून घेण्यासाठी आपला आकार वाढवला आणि चरबीचा जाड थर विकसित केला. शेवटचे हिमयुग संपल्यानंतर समुद्राची पातळी वाढली. यामुळे या प्राण्यांचे मुख्य खाद्य असलेले केल्पची जंगले तुटली आणि त्यांचे कळप एकमेकांपासून वेगळे पडले, ज्यामुळे त्यांची संख्या आधीच कमी झाली होती.

**मानवाच्या हातून झाला स्टेलर्स सी काऊचा अंत :**


जेव्हा स्टेलर आणि त्यांच्या साथीदारांनी स्टेलर्स सी काऊ या प्राण्याचे मांस खाल्ले, तेव्हा त्यांना ते अत्यंत चविष्ट आणि पोषक वाटले. तसेच, या प्राण्यामध्ये प्रतिकार करण्याची क्षमता नव्हती. या शोधानंतर लगेचच, शिकाऱ्यायांनी बेरिंग समुद्रात मोठ्या संख्येने स्टेलर्स सी काऊ शिकार सुरू केली. मांस, जाड चरबी (तेल आणि इंधनासाठी) आणि कातडी यासाठी त्यांची मोठ्या प्रमाणावर हत्या झाली. शिकार सुरू झाल्यानंतर अवघ्या २७ वर्षांत (१७६८ च्या सुमारास) या प्रजातीचे शेवटचे ज्ञात स्टेलर्स सी काऊ मारले गेले आणि हा सागरी प्राणी जगातून पूर्णपणे नामशेष झाला. जॉर्ज स्टेलर यांनी शोधलेला स्टेलर्स सी काऊ हा प्राणी, मानवामुळे इतिहासजमा झालेल्या प्राण्यांच्या सर्वात दुःखद उदाहरणांपैकी एक बनला.

## अमेरिकेत एआयला 'चाप'


अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घोषणा केली आहे की, त्यांचे सरकार संपूर्ण देशात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) साठी एक 'समान नियम' लागू करेल. जर प्रत्येक राज्याने स्वतःचे वेगळे नियम बनवले, तर अमेरिकेचे तंत्रज्ञान क्षेत्रातील वर्चस्व कमी होऊ शकते, असे त्यांचे मत आहे.

सोशल मीडियावर ट्रम्प यांनी लिहिले की, जगातील एआय स्पर्धेत पुढे राहण्यासाठी अमेरिकेला एकाच राष्ट्रीय नियमपुस्तिकेची गरज आहे. जर 'एआय' साठी प्रत्येक राज्याने स्वतःचे नियम आणि मंजुरीची प्रक्रिया लागू केली, तर नवाचाराची गती मंदावेल. त्यांनी सांगितले की, या आठवड्यात ते 'ONE RULE Ewebrviue Order' जारी करतील, ज्यामुळे 'एआय' नियमांची प्रक्रिया सोपी आणि एकसमान होईल.

ट्रम्प म्हणाले, 'तुम्ही जर एखाद्या कंपनीकडून अशी अपेक्षा करत असाल की, तिने प्रत्येक कामासाठी ५० राज्यांकडून वेगवेगळ्या मंजुऱ्या घ्याव्यात, तर ते शक्य नाही.' ट्रम्प यांचा हा निर्णय अलीकडेच सुरू केलेल्या 'जेनेसिस मिशन' नंतर आला आहे. हा एक राष्ट्रीय कार्यक्रम आहे, ज्याचे उद्दिष्ट 'एआय' च्या मदतीने वैज्ञानिक शोधांची गती वाढवणे आणि अमेरिकेचे तांत्रिक वर्चस्व मजबूत करणे आहे. व्हाईट हाऊसनुसार 'जेनेसिस मिशन' एक असा 'एआय' प्लॅटफॉर्म तयार करेल जो मोठ्या संघीय डेटा सेटस्चा वापर करून नवीन वैज्ञानिक मॉडेल्स आणि 'एआय' एजंट तयार करेल. हे एआय एजंट नवीन वैज्ञानिक सिद्धांतांची चाचणी करतील, संशोधनाचे काम जलद करतील आणि वैज्ञानिक यशांना पुढे नेतील.



# अंतरी.... एक काव्य प्रवास मनाचा




अहिल्यानगर साहित्य क्षेत्राच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण जिल्हा आहे. येथील शब्दगंध साहित्य परिषदेच्या वतीने याहीवर्षी १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन २३ आणि २५ मे रोजी अहिल्यानगरमध्ये होत आहे. यानिमित्ताने माझी प्रिय मैत्रीण सुरेखा घोलप यांचा 'अंतरी' हा काव्यसंग्रह प्रकाशित होणार आहे. प्रकाशनापूर्वीच या पुस्तकाने अनेकांची मने जिंकली आहेत. म्हणूनच सहृदय कवयित्री सुरेखा घोलप यांचे खूप खूप अभिनंदन.

दाटून आलेल्या संध्याकाळी अवचित सोनेरी ऊन पडतं शब्दांचं आभाळ ही दाटून आलं की कविते तुझ सुंदर शिल्प घडतं असंच काहीसं सुरेखा ताईंच्या कवितेबाबत म्हणावं लागेल. हृदयातली असंख्य दुःखे दाबून धरूनही जेव्हा ओठावर आणि चेहऱ्यावर हसू असतं तेव्हा पाषाण हृदयालाही पाझर फुटत असतो. वैयक्तिक दुःख मनात दाबून सुरेखा ताईंनी आपले मन लेखनात गुंतवले इतकेच नाही तर स्वतःचे पुस्तक प्रकाशित करण्याअगोदर स्वतःच्या मुलगा छोट्या गौरवच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्याच्या 'गंपूच्या गोष्टी' हा कथासंग्रह प्राणपणाने कष्ट घेऊन प्रकाशित केला आणि तितकाच तो यशस्वी झाला.

आई म्हणजे जणू मंदिराची पायरी.. स्वतः कष्ट सोसून लेकाला जणू सरस्वतीचे दर्शन सुरेखा ताईंनी घडवून दिले. 'अंतरी' या त्यांच्या ५१ कवितांच्या प्रथम कविता संग्रहात मनातील विविध भावभावनांची प्रतिबिंबे उमटविणाऱ्या कविता आपल्याला पाहायला मिळतात.

**दगड पडला पाण्यात प्रतिबिंबटच डचमळले**
**अन् तुषार झेलत मी मलाच घेऊन निघाले**

या त्यांच्या पहिल्याच कवितेत त्या मनातील वेदना व्यक्त करतात. माणसाच्या आयुष्यात दुःख हे तप्त उन्हाळ्याप्रमाणे असलं तरी आपल्याला गुलमोहोरासारखे फुलता यायला हवं हे त्यांच्या गुलमोहोर या कवितेतून त्या अगदी निर्भयपणे सांगतात. त्याचं फुलणं बघून त्या त्याला प्रश्नही विचारतात हे प्रश्न उदास करत नाही तर माणसाच्या मनात नव चेतना निर्माण करतात. सुरेखाताई त्यांच्या कवितेत पुरोगामी विचारही ठिकठिकाणी पेरतात. त्यांच्या लेकी सावित्रीच्या या कवितेमध्ये वटसावित्रीच्या दिवशी सावित्रीच्या लेकी होऊ, फुल्यांची सावित्री आठवू असं त्या ठणकावून सांगतात. माणूस म्हणून जन्माला आल्यावर जास्त न बघायला मिळणारी गोष्ट म्हणजे माणुसकी, त्या आपल्या कवितेत सांगतात.

माणसांच्या वागण्याच्या वेगवेगळ्या तऱ्हा मध्ये माणुसकी कोठे आहे ? असा प्रश्न त्या विचारतात. दुःखाने होरपळत असलेल्या या कवयित्रीच्या मनात प्रेमही तितकेच भरलेले आहे आणि हेच प्रेम त्या सख्या या कवितेत सख्या तुझे एकटक पाहणे अन् मी घट्ट पापण्या मिटवून घेणे इतके सवयीचे झाले.अशाप्रकारे व्यक्त करतात की कवितेच्या प्रेमात पडल्याशिवाय माणूस राहत नाही.

आपल्या झाड या कवितेतून त्या वाचकांच्या नजरेतही हिरवाईचे स्वप्न पेरतात. श्रावण या कवितेतून ही कवियत्री श्रावणासारखी फुलत राहते. आणि आठवणींचे उमाळे या कवितेतून आपल्यालाही आठवणींच्या जगात घेऊन जाते. मनाने संवेदनशील माणुसकीची जाण असणारी ही कवयित्री दुनियेत वावरताना आपली स्वतःची एक वेगळी नजर ठेवते आणि अंतरीची ही नजर तिच्या अनेक कवितांमधून आपल्याला स्पष्ट जाणवते. अंतरी हे नाव ही खूप भावस्पर्शी आहे.

मन, भावना, गूढता आणि अंतर्मनातील प्रवासाचा सुंदर संगम यात जाणवतो. अंतरी ही निःशब्द भावनांची भाषा आहे. असे मला वाटते. अंतरातून ती बोलते आहे, तिच्या शब्दांतून तिला क्रांती हवी आहे म्हणून हृदयांतरीच्या कवितांचा हा भावनिक दरवळ अशा अनेक सुंदर कवितांनी नटलेला साहित्य रसिकांनी अनुभवावा. हा काव्यसंग्रह अंतरी खूप सुंदर आहे. आणि प्रत्येकाने वाचावा असा आहे. लेखन सुजाता पुरी यांनी केले आहे.

**– सुजाता नवनाथ पुरी, अहिल्यानगर मो.नं.८४२१४२६३३७**

# 'अधिकमास पर्वकाळा'निमित्त २४ मे रोजी श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रम

नगर – श्री स्वामी समर्थांच्या कृपाशीर्वादाने तसेच मुकुंद महेश्वर करंदीकर ऊर्फ नाना यांच्या प्रेरणेतून अधिकमास पर्वकाळानिमित्त २४ मे रोजी दिवसभर चालणाऱ्या श्री स्वामी समर्थ ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ८.४५ ते सायंकाळी ७ या वेळेत होणाऱ्या या आध्यात्मिक सोहळ्यात स्वामी भक्तांसाठी सामूहिक स्तवन, प्रार्थना, दर्शन व महाप्रसादाचा लाभ उपलब्ध होणार आहे.

अधिकमास हा हिंदू धर्मामध्ये अत्यंत पुण्यदायी आणि आध्यात्मिक साधनेसाठी महत्त्वपूर्ण मानला जातो. या पवित्र पर्वकाळात श्री स्वामी समर्थांच्या नामस्मरणाने व स्तवनाने भक्तांच्या जीवनात सकारात्मक ऊर्जा, मानसिक शांती आणि आध्यात्मिक समाधान लाभते, अशी श्रद्धा आहे. या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या ७८४ स्तवन मंडल कार्यक्रमात दिवसभर चार सत्रांमध्ये प्रत्येकी सात स्तवन मंडले पार पडणार असून एकूण ७८४ आवर्तनांचे सामूहिक पठण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता पहिल्या सत्राने होणार असून सकाळी ९ ते ११.१५ या वेळेत सात स्तवन मंडले म्हणजेच १९६ आवर्तने पूर्ण केली जाणार आहेत. त्यानंतर चहापानाचा अल्पविराम ठेवण्यात आला आहे. दुसऱ्या सत्रात सकाळी ११.३० ते दुपारी १.४५ या वेळेत पुन्हा सात स्तवन मंडलांचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर फराळ मध्यांतर असेल. दुपारी २.१५ ते सायं. ४.३० या वेळेत तिसरे सत्र पार पडणार असून त्यामध्येही १९६ आवर्तनांचे पठण होईल. सायंकाळी चहापानानंतर अंतिम चौथ्या सत्रात सायं. ४.४५ ते ७ या वेळेत शेवटची सात स्तवन मंडले पूर्ण करण्यात येतील. त्यानंतर रात्री ७ ते ९.३० या वेळेत सांघिक प्रार्थना, उत्तरार्ध, दर्शन व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे.

या दिव्य आध्यात्मिक सोहळ्यात सहभागी होऊन श्री स्वामी समर्थांच्या कृपेचा व दिव्य अनुभूतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

कार्यक्रमासाठी दिनेश अ. निसळ (मो. ८६०५३४०९७७), सौ. अलका गंधे तसेच विनीत कावळे (मो. ९८९०३७५७४४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती स्मारकासाठी वाडीयापार्क येथील जागा उपलब्ध करुन द्यावी : संभाजी कदम

**जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी**




नगर – अहिल्यानगर शहरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासह भव्यदिव्य असे स्मारक व्हावे त्यामध्ये वाचनालय, अभ्यासिका, संस्कार वर्ग, पुर्व परिक्षा केंद्र, ऑडीटोरिअम हॉल, ग्रंथालय यांची निर्मिती करुन असे अद्यावत स्मारक होणे गरजेचे आहे, अशी मागणी संभाजी कदम यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे केली आहे.

ते म्हणाले, जगाला शिक्षणाचा संदेश देणारे फुले दाम्पत्य स्त्री शिक्षणाचा जागर करणाऱ्या महान पुरुषांचे स्मारक त्यांच्या विचारांनी झाले पाहिजे व ते होणे गरजेचे आहे. असे स्मारक करण्यासाठी १० ते १५ हजार स्क्वेअर फुट जागेची गरज असून ही जागा आपण अध्यक्ष असलेल्या वाडियापार्क क्रीडा संकुल मध्ये उपलब्ध आहे. महात्मा फुले शाळेसमोरील जागा ही टी. पी. स्कीम नं. ३, फायनल प्लॉट नं. १९३ या ठिकाणी असून यामध्ये आम्ही मागणी केलेल्या व फुलेंच्या विचारांचे स्मारक तेथे बांधता येईल. त्यांचा जीवनपट तिथे सादर करता येईल. असे स्मारक जे महाराष्ट्राला दिशा देणारे असेल. पर्यटकांची गर्दी वाढुन हे स्मारक नावलौकीक ठरेल. त्यामुळे आपण अध्यक्ष या नात्याने या जागेची पाहणी समक्ष करुन लवकरात लवकर निर्णय घ्यावा व आपण जागा निश्चित करुन त्यावर आदर्श स्मारकासाठी इंजिनिअरींग असोसिएशन व इतर क्रिडाई सारख्या संस्थांकडून याचे डिझाईन करण्यात यावे व महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुर्णाकृती स्मारकासाठी सदर जागा उपलब्ध करुन द्यावी, अशी निवेदनाद्वारे मागणी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे शिवसेनेच्यावतीने शहर प्रमुख संभाजी कदम यांनी केली आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पंडित नेहरु यांना माहित होता का?

**नेहरु उद्यानावरुन दिनेश जोशी यांचा दीप चव्हाण यांना सवाल**





नगर – नेहरू उद्यानाच्या जागेवर भव्य वाचनालय उभारण्याच्या मागणीवरून काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीप चव्हाण यांनी केलेल्या टीकेला दिनेश जोशी यांनी जाहीर पत्रकाद्वारे उत्तर दिले आहे. मला इतिहासाचा अभ्यास करण्याचा सल्ला देणाऱ्यांनी आधी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास माहीत होता का ? याचे उत्तर द्यावे, असा सवाल जोशी यांनी चव्हाण यांना केला आहे.

यापूर्वी दीप चव्हाण यांनी एक पत्रक प्रसिद्धीस देवून कोण एक तो जोशी असा उल्लेख केला होता. त्यावर उत्तर देण्यासाठी जोशी यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे, माझे वडील स्व. रमेश जोशी यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक वर्षे समाजकार्य केले असून, ते हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख होते. हे विचार मला तेथूनच मिळाले आहेत. तसेच महानगरपालिका होण्यापूर्वी माझ्या वडिलांनीही नेहरू उद्यानाच्या सुशोभीकरणाची मागणी पालिकेकडे केली होती; मग चव्हाण यांनी त्यांच्या कार्यकाळात यासाठी काय लढा दिला?

नेहरूंनी त्यांच्या ग्लिम्प्स ऑफ वर्ल्ड हिस्ट्री पुस्तकात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल आणि अफझलखान वधाच्या प्रसंगावरून चुकीची माहिती पुस्तकात उधृत केली होती. नंतर त्यांनी ती चूक कबूल केली. दुसऱ्या आवृत्तीत तो उल्लेख त्यांनी हटविला. यावरुनही जोशी यांनी चव्हाण यांच्यावर निषाणा साधला. भारताच्या पहिल्या पंतप्रधानांना छत्रपती शिवरायांचा इतिहास माहीत नव्हता, हा याचा अर्थ निघतो, असा प्रश्न जोशी यांनी केला आहे. तसेच पुढे जोशी यांनी नेहरूंच्या अक्साई चीनवरील तिथे गवताचे पातेही उगवत नाही या विधानाचा दाखला देत चव्हाण यांच्यावर टीका केली आहे. काँग्रेसी लोकांना नेहरू–गांधी परिवार म्हणजेच देश असा भ्रम झाला आहे, अशी टीका करत जोशी यांनी नेहरू उद्यानाच्या ठिकाणी भव्य वाचनालय उभारण्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला.

तुम्ही ज्या भागातून अनेक वर्षे नगरसेवक म्हणून निवडून आलात, तिथे आद्यक्रांतिगुरु लहुजी वस्ताद साळवे आणि लोकशाहीर अणाभाऊ साठे यांच्या नावाने मोठे स्मारक, वाचनालय किंवा व्यायामशाळा उभारण्यासाठी काय प्रयत्न केले, याचे उत्तर द्यावे, असे थेट आव्हानही जोशी यांनी चव्हाण यांना दिले आहे.

# गंगागिरी महाराजांच्या सप्ताहासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करा

**जिल्हाधिकारी यांना निवेदन, एक कोटी भाविकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे अभिजीत पोटे यांची रस्ता सुरक्षा समितीकडे मागणी**



गंगागिरी महाराजांच्या सप्ताहासाठी रस्ते तातडीने दुरुस्त करा या मागणीसाठी शिवसेनेचे अभिजीत पोटे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांना निवेदन दिले.

नगर – राहाता तालुक्यातील धनगरवाडी येथे ऑगस्ट महिन्यात होणाऱ्या गंगागिरी महाराजांच्या अखंड हरिनाम सप्ताहासाठी राज्यभरातून जवळपास एक कोटी भाविक उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर धनगरवाडी गावाला जोडणाऱ्या सर्व प्रमुख रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीच्या सोयीसाठी तातडीने रस्त्यांची दुरुस्ती व नव्याने बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी शिवसेनेचे अभिजीत पोटे यांनी केली आहे.

२० एप्रिल रोजी झालेल्या रस्ता सुरक्षा समिती बैठकीत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर अद्याप ठोस उपाययोजना झालेली नसल्याचे नमूद करत, त्यांच्या निवेदनातील प्रश्नांचा समावेश करून तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

अभिजीत पोटे यांनी दिलेल्या निवेदनानुसार धनगरवाडी परिसरातील अनेक महत्त्वाचे रस्ते अतिशय खराब अवस्थेत आहेत. पुणतांबा– जळगाव – वाकडी – दिघी या मार्गावरील सुमारे २५ किलोमीटरचा प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील रस्ता नव्याने करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच गणेशनगर फाटा ते वाकडी टर्निंग पॉईंट दरम्यानचा २ किलोमीटर जिल्हा परिषद रस्ता देखील पूर्णतः खराब झाल्याने त्याचे तातडीने नूतनीकरण करण्याची मागणी करण्यात आली आहे.

श्रीरामपूर एमआयडीसी ते धनगरवाडी दरम्यानचा ७०० मीटरचा रस्ता जड वाहतुकीमुळे पूर्णपणे खराब झाला असून, एमआयडीसीतील अवजड वाहनांची क्षमता लक्षात घेऊन मजबूत डिझाईनचा नवीन रस्ता उभारण्यात यावा, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय धनगरवाडी रेल्वे अंडरपासमार्गे गावापर्यंतचा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता नव्याने तयार करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मराठवाड्याच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरणारा खैरी ते नाऊर आणि पुढे श्रीरामपूर – गोवर्धन मार्गे सराला बेटाला जोडणारा एकूण १२ किलोमीटरचा रस्ता देखील अत्यंत खराब अवस्थेत असल्याचे पोटे यांनी निदर्शनास आणून दिले. हा रस्ता नव्याने झाल्यास मराठवाडा आणि धनगरवाडी यांतील संपर्क वाढून प्रवासाचा वेळ केवळ ३० मिनिटांवर येईल. तसेच समृद्धी महामार्गालाही या मार्गाचा मोठा फायदा होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पावसाळ्याच्या कालावधीतच सप्ताहाचे आयोजन होत असल्याने, भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आणि वाहतुकीतील अडचणी टाळण्यासाठी सर्व रस्त्यांची कामे तातडीने मंजूर करून सप्ताहापूर्वी पूर्ण करण्यात यावीत, अशी मागणी अभिजीत पोटे यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# परवानगीशिवाय शेतमाल खरेदी-विक्री करु नये : पणन संचालक शरद जेरे

नगर – महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ अंतर्गत राज्यातील शेतमाल खरेदी–विक्री व्यवहारांचे विनियमन करण्यात येत असून, परवानगीशिवाय सुरू असलेल्या व्यवहारांवर कारवाई करण्यात येणार आहे. सर्व व्यापारी, संस्था आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी अधिनियमातील तरतुदींचे पालन करूनच व्यवहार करावेत, असे आवाहन पणन संचालक शरद जेरे यांनी केले आहे.

राज्यातील विविध भागांमध्ये काही व्यापारी, संस्था तसेच शेतकरी उत्पादक कंपन्यांकडून कोणतीही आवश्यक परवानगी न घेता मोठ्या प्रमाणात शेतमाल खरेदी–विक्री व्यवहार सुरू असल्याच्या तक्रारी पणन संचालनालयास प्राप्त झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पणन संचालकांनी परिपत्रक जारी करून संबंधितांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

महाराष्ट्र शासन राजपत्रातील अध्यादेश क्रमांक १५ दिनांक ५ जुलै तसेच त्यानंतर करण्यात आलेल्या सुधारित तरतुदींचा उल्लेख परिपत्रकात करण्यात आला आहे. त्यानुसार मुख्य अधिनियमातील कलम ५ मधील काही तरतुदींमध्ये बदल करण्यात आले असून, विशिष्ट परिस्थितीत बाजार समितीकडून विनियमन लागू राहणार नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तथापि, थेट पणन, खाजगी बाजार, शेतकरी ग्राहक बाजार तसेच ई–ट्रेडिंग प्लॅटफॉर्म यांसारख्या व्यवहारांसाठी संबंधित परवाने घेणे आवश्यक राहणार असल्याचे पणन संचालनालयाने कळविले आहे. आवश्यक परवानगी अथवा लायसन्सशिवाय शेतमाल खरेदी–विक्री व्यवसाय केल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असेही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

याबाबत काही तक्रार असल्यास संबंधित बाजार समिती प्रशासनाशी संपर्क साधावा असे आवाहन मंगेश सुरवसे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केले आहे.

# गावठी कट्टा बाळगल्या प्रकरणात एकाची अवघ्या चार तासांमध्ये जामीनावर मुक्तता

नगर – पुणे बायपास रोडयेथे २०/०५/२०२६ रोजी बंद पडलेल्या टपरीमध्ये एक इसम स्वतः जवळ गावठी पिस्तूल बाळगूळ असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाल्यावरून पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकला असता शेख नावाचा व्यक्ती तेथे मिळून आला त्याच्या ताब्यात एक गावठी पिस्तूल व तीन जिवंत कारतूस मिळून आले. शेख यास पोलिसांनी जागेवरच ताब्यात घेऊन त्याच्याकडील गावठी पिस्तूल व कारतूस जप्त केले. त्याच्याविरुद्ध कोतवाली पोलीस स्टेशन येथे हत्यार कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला. आरोपी शेख यास न्यायालयासमोर हजर करून तपासी अधिकारी यांनी पोलीस कोठडीची मागणी केली. आरोपीने गावठी पिस्तूल कोणाकडून आणले त्याचा उद्देश काय होता व येणाऱ्या ईद सणामध्ये काही अघटीत करण्याचा त्याचा उद्देश होता का या मुद्द्यांवर पोलीस कोठडीची मागणी केली.

आरोपी शेख यांचे विधिज्ञ अॅड. सुहास टोणे यांनी शेख याचा सदर गुन्ह्याची काहीही संबंध नाही तसेच पोलिसांनी हत्यार कायद्यातील तरतुदींचे पालन केलेलेया व अनेक मुद्द्यांवर युक्तिवाद केला. वकिलांचा युक्तिवाद ऐकून माननीय न्यायालयाने आरोपी शेख यास पोलिसांनी मागणी केलेली पोलीस कोठडीची मागणी फेटाळून लावली. तसेच आरोपी शेख यास तात्काळ जामिनावर सोडून देण्याचा आदेश केला. आरोपी शेख याच्याकडे गावठी पिस्तूल व जिवंत कारतूस मिळून देखील त्यास तात्काळ जामीन कसा मिळाला हा चर्चेचा विषय ठरला आहे. शेख यांच्या वकिलांचे युक्तीवादामुळेच हे शक्य होऊ शकले. आहे यावर सर्वत्र चर्चा सुरू आहे. या प्रकरणात आरोपी शेख याची तर्फे विधिज्ञ सुहास टोणे यांनी कामकाज पाहिले. त्यांना अॅड. शिवानी सापिके, अॅड. विलास ढोणे, अॅड. अमित अडागळे, विजय केदार, अॅड. ओम गुंड, अॅड. अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले.

# तारकपूर रोडवर एकाच व्यक्तीकडून २ तरुणींचा विनयभंग

नगर – शहरातील तारकपूर परिसरात डीएसपी चौक ते पत्रकार चौक रस्त्यावर एकाच व्यक्तीने २ तरुणींचा दुचाकीवरून पाठलाग करत अश्लील बोलून विनयभंग केल्याच्या २ वेगवेगळ्या घटना २० मे रोजी दुपारी ३ व रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडल्या आहेत. दोन्ही तरुणींच्या फिर्यादींवरून आरोपी बंटी उर्फ संकेत ससाणे (रा. सिद्धार्थनगर) याच्या विरुद्ध विनयभंगाचे २ वेगवेगळे गुन्हे तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल झाले आहेत. एक २२ वर्षीय तरुणी २० मे रोजी दुपारी ३ च्या सुमारास झुलेलाल चौकातून पत्रकार चौकाकडे मोपेड वरून जात असताना आरोपी बंटी ससाणे याने तिचा मोटारसायकल वर पाठलाग करत तिला अश्लील बोलून विनयभंग केला. तसेच त्याच दिवशी रात्री ११ च्या सुमारास २० वर्षीय तरुणी तारकपूर बसस्थानकासमोरून जात असताना आरोपी बंटी ससाणे याने तिचा मोटारसायकल वर पाठलाग करत तिला अश्लील बोलून विनयभंग केला आणि वेगात पुढे निघून गेला असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

# कुंभमेळ्यासाठी शिर्डी-पंढरपूर रेल्वे पुन्हा सुरू करा; छावा संघटनेच्यावतीने रेल्वे महाप्रबंधकांकडे मागणी

नगर – कोरोना काळापासून बंद असलेली साईनगर शिर्डी ते पंढरपूर ही रेल्वे सेवा भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी लवकरात लवकर पूर्ववत सुरु करावी, अशी मागणी अखिल भारतीय छावा मराठा युवा संघटनेच्या वतीने मध्य रेल्वे प्रशासनाकडे करण्यात आली आहे. संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा सुरेखा सांगळे पाटील यांनी मध्य रेल्वेचे महाप्रबंधक (मुंबई) यांना या संदर्भात निवेदन दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे, कोरोना महामारीच्या काळात सुरक्षेचा उपाय म्हणून अनेक रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यात साईनगर शिर्डी–पंढरपूर या महत्त्वाच्या रेल्वेचाही समावेश होता. ही रेल्वे बंद असल्यामुळे विठ्ठल भक्तांना आणि संपूर्ण वारकरी संप्रदायाला प्रवासासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. आगामी डिसेंबर २०२६ मध्ये नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळा संपन्न होणार आहे. या कुंभमेळ्यासाठी संपूर्ण भारतातून कोट्यवधी नागरिक आणि भाविक महाराष्ट्रात येतील. जर ही रेल्वे सेवा वेळेत सुरू झाली, तर देशभरातून येणाऱ्या सर्वच भाविकांना या रेल्वेचा मोठा लाभ होईल, याकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले आहे. या निवेदनाची प्रत मध्य रेल्वेच्या महाप्रबंधक कार्यालयाने स्वीकारली असून, लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शिर्डी आणि पंढरपूर या दोन धार्मिक क्षेत्रांना जोडणारी ही रेल्वे तातडीने सुरू व्हावी, अशी मागणी भाविकांमधून होत आहे.

# अनोळखी व्यक्तीच्या हल्ल्यात व्यावसायिक जखमी

**स्टेशन रस्त्यावरील मल्हार चौकातील घटना; गुन्हा दाखल**

नगर – शहरातील स्टेशन रस्ता परिसरात २१ मे रोजी पहाटेच्या सुमारास एका फर्निचर व्यावसायिकावर अनोळखी इसमाने अचानक हल्ला करून जखमी केल्याची घटना घडली आहे. भरत माऊजी पित्रोडा (वय ४४, रा. आगरकर मळा, स्टेशन रस्ता) असे जखमी व्यावसायिकाचे नाव आहे. त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी भरत पित्रोडा यांचे आगरकरमळा परिसरात फर्निचर दुकान आहे. ते गुरूवारी पहाटे ३.१५ वाजता पुणे बसस्थानक परिसरात गेले होते. तेथून परत घरी जात असताना ३.२५ वाजता मल्हार चौक, स्टेशन रस्ता येथे एका अनोळखी व्यक्तीने त्यांना आवाज देऊन थांबवले. त्यानंतर झालेल्या वादातून त्या व्यक्तीने फिर्यादीच्या कानाखाली चापट मारली तसेच शिवीगाळ केल्याचा आरोप आहे. परिस्थिती चिघळल्यानंतर संबंधित व्यक्तीने रस्त्यावर पडलेला दगड उचलून त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस जोरात मारल्याने ते जखमी झाले. हल्ल्यानंतर संबंधित व्यक्तीने धमकी देत तुला काय करायचे ते कर, पोलिसांकडे जा असे म्हणत घटनास्थळावरून पळ काढल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. जखमी अवस्थेत पित्रोडा यांनी तत्काळ कोतवाली पोलीस ठाणे गाठले, त्यानंतर पोलिसांनी त्यांना वैद्यकीय उपचारासाठी शासकीय रूग्णालयात पाठवले. उपचार घेतल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून पोलीस अमलदार सोनवणे अधिक तपास करीत आहेत.

# सरपंच शरद पवार यांचा जामीन न्यायालयाने फेटाळला

नगर – सोशल मीडियावर खासदार निलेश लंके यांच्या विरोधात व्हिडिओ पोस्ट केल्याच्या रागातून एका तरुणाचे पुण्यातील खराडी भागातून अपहरण करून त्याला नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे डांबून ठेवत अमानुषपणे मारहाण केल्या प्रकरणी दाखल गुन्ह्यात अटक केलेले चिचोंडी पाटीलचे सरपंच शरद खंडू पवार यांचा जामीन अर्ज अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस आर शिंदे यांनी फेटाळला आहे.

याबाबत बीड जिल्ह्यातील आष्टी येथील रहिवासी किशोर महादेव परभणे (वय २८) यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात ४ मे रोजी फिर्याद दिली होती. या फिर्यादी वरून प्रणव विजय मोरे (रा.आठवड, ता.नगर), शरद खंडू पवार, मारुती देवराम कोकाटे (दोघे रा. चिचोंडी पाटील, ता.नगर), रॉबीन सिंग आणि एका अनोळखी व्यक्ती विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल झाल्यानंतर शरद पवार यांनी अटकपूर्व जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला होता. तो फेटाळण्यात आल्यानंतर पवार हे पोलिसांना शरण गेले व पोलिसांनी त्यांना अटक केली होती. सध्या ते न्यायालयीन कोठडीत आहेत. त्यांच्या वतीने न्यायालयात जामिनासाठी अर्ज करण्यात आला होता. या अर्जावर झालेल्या सुनावणीच्या वेळी सरकारी वकील धैर्यशील उर्फ अजित लक्ष्मण वाडेकर यांनी प्रखर युक्तिवाद करत जामीन देण्यास नकार देण्याची मागणी केली. त्यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी एस आर शिंदे यांनी पवार यांचा जामीन अर्ज फेटाळला आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

